बुधवार, 21 सप्टेंबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 50
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 21 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-50 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

# सोन्याचा चमचा घेऊन आलेलेच मुख्यमंत्री झाले पाहिजे का ?

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जळगावात राष्ट्रवादीसह उद्धव ठाकरेंवर सडकून टीका

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव : गुलाबराव पाटील यांना दरवेळी पानटपरीवाला म्हणून हिणवण्यात येते. कुणाला हिणवणे चुकीचे आहे. कुणीही शून्यातून येऊन नवनिर्मिती करत असतो. मी शेतकऱ्याचा मुलगा, आज मुख्यमंत्री झाला, पण हे विरोधकांना चालत नाही. मात्र जनतेने आम्हाला स्वीकारल आहे. हे तुम्ही ध्यानात ठेवा. सोन्याचा चमचा घेऊन आलेलेच मुख्यमंत्री झाले पाहिजे का? असा सवाल करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जळगावात राष्ट्रवादीसह उद्धव ठाकरेंवर सडकून टीका केली.**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जळगाव दौऱ्यावर असून मुक्ताईनगर येथे जाहीर सभा झाली. यासभेत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी पक्षावर प्रहार केला. यातच एकनाथ शिंदे हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर प्रथमच जळगाव जिल्हा दौऱ्यावर आले होते. मुक्ताईनगर शहरातील क्रीडा संकुलाच्या मैदानामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा झाली. यावेळी ते म्हणाले कि, शिवसेनेत असताना आम्ही उद्धव ठाकरे यांना राष्ट्रवादी पक्ष संपवीत आहे, हे वारंवार सांगत होतो. त्यावेळी गुलाबराव पाटील देखील म्हणत होते, त्यांना सांगा राष्ट्रवादी आपल्याला संपवीत आहे. मी स्वतः त्यांना पाच वेळा सांगितले, की राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर गेलो ती चूक सुधारवा पण ऐकले नाही.

ते पुढे म्हणाले, की आम्ही बाळासाहेब ठाकरे आणि मोदीचा फोटो लावला आणि निवडणूक जिंकलो. शिवसेनेतून बाहेर पडत आम्ही बरोबर केले. मात्र झोपेचे सोंग घेतलेल्याला कसे जागे करणार? आम्ही चूक सुधरवली मग गद्दार कोण? असा सवाल त्यांनी उद्धव ठाकरे यांना केला. आमदार खासदार यांची काम होत नव्हती, आता ती दोन महिन्यात केली. विरोधी पक्ष आता घाबरला असून एकनाथ शिंदे गणपती मंडळ फिरतो, घराघरात जातो. त्यामुळे ते फिरत आहेत. आता त्यांनी अर्धे पुण्य मला द्यायला हवे. तर काहीजण दोन मुख्यमंत्री ठेवण्याचे सांगतात. मात्र त्यांना आधीचा अनुभव असल्याने ते असे म्हणत असल्याचा खोचक टोलाही मुख्यमंत्र्यांनी अजित पवार यांना लगावला. जळगावात गुलाबराव पाटलाचे प्रस्थ आहे. मात्र गुलाबराव पाटलांना हिणवले जाते. कुणीही हिणवण्याचे काम करू नये. मी स्वत शेतकऱ्याचा मुलगा आहे, मात्र मुख्यमंत्री झाल्यावर ते चालत नाही. सोन्याचा चमचा घेऊन आलेलेच मुख्यमंत्री झाले पाहिजे का? असा सवाल त्यांनी उपस्थितांना केला. शाहजी बापू स्टेजवर आल्यावर लोकांच्या टाळ्या वाजल्या. मुख्यमंत्र्यांनी शाहजी बापूचा फेमस डायलॉग म्हटला. दोन वर्षात आम्ही एवढे काम करू की औषधालासुद्धा कोणी शिल्लक राहिला नाही.



**200 चा आकडा गाठणार**

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादीवर सडकून टीका केली . ते म्हणाले की, आम्हाला राष्ट्रवादीच्या लोकांना सांगायचे आहे, आम्ही निवडणूक बघून काम करत नाही . गुलाबराव पाटील यांनी 22 हजार पाणी पुरवठा योजना मंजूर केल्या आहेत . बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची शिवसेना आम्ही पुढे नेतोय . हैदराबादला गेलो होतो, त्यावेळी तिथले नागरिक आमच्यासोबत लोक फोटो काढत होते . गर्दी झाल्याने पोलिसांना आवरणे कठीण झाले होते . आज आम्ही 170 आहोत . आता फक्त 30 चा आकडा वाढवायचा आहे, त्यामुळे 200 च्या पुढे गेलो तरी आश्चर्य वाटायला नको, हे ग्रामपंचायत निवडणुकीवरून सिद्ध होते असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले .

### महत्त्वाची बातमी

## जागतिक बँकेकडून पंजाबला १५० दशलक्ष डॉलर्सचे कर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जागतिक बँकेने पंजाबमधील विकासकामांसाठी १५० दशलक्ष डॉलर्सचे कर्ज मंजूर केले आहे. या कर्जाच्या माध्यमातून पंजाबमध्ये सार्वजनिक सोईसुविधांमध्ये सुधारणा करण्याचे काम केले जाणार आहे. पंजाब सरकारकडून वेगवेगळ्या सरकारी विभागांची क्षमता वाढवण्याचे काम केले जात आहे. पंजाबमधील शास्वत विकास वाढीसाठी आम्ही हा निधी देत आहोत, असे जागतिक बँकेने सांगितले आहे. आतापर्यंत पंजाब राज्याचा क्षमतेपेक्षा कमी विकास झालेला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पंजाबाच्या विकासकामाला पाठिंबा देत आहोत. वेळेवर, किफायतशीर आणि उत्तम दर्जाच्या सार्वजिक सेवा पुरवण्याच्या पंजाबच्या प्रयत्नांत जागतिक बँक एक सहकारी असल्याचा आम्हाला आनंद आहे, असे जागतिक बँकेने आपल्या निवेदनात म्हटले आहे. मिळालेल्या निधीच्या माध्यमातून पंजाबमध्ये दोन टप्प्यांत काम केले जाईल. पहिल्या टप्प्यात पंजाबमध्ये सार्वजनिक सेवा-सुविधांची व्याप्ती वाढवण्यासाठी तसेच वितरण प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी महापालिकांना प्रोत्साहित केले जाईल. तसेच अमृतसर आणि लुधियानासारख्या शहरांमधील निवडक भागात पूर्णवेळ पाणी पुरवठा करण्यासाठी प्रयत्न केले जातील. पाणीगळती तसे पाणी वितरण प्रणालीमध्ये या निधीच्या मदतीने सुधारणा करण्यात येतील.

# ‘लम्पी’ रोगाला राष्ट्रीय आपत्ती घोषित करा

## गेहलोत यांची केंद्राकडे मागणी : जयपुरात भाजपाचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**जयपूर :** ‘लम्पी’ आजाराच्या प्रादुर्भावामुळे राजस्थानमध्ये आत्तापर्यंत तब्बल ५७ हजार गायी दगावल्या आहेत, तर ११ लाख गायींना या रोगाची लागण झाली आहे.
या विरोधात भाजपाकडून जयपूरमध्ये तीव्र आंदोलन करण्यात आले. राज्य विधानभवनावर काढण्यात आलेला मोर्चा पोलिसांनी रोखल्यानंतर आंदोलकांची पोलिसांसोबत शाब्दिक चकमक झाली. यावेळी आंदोलकांनी बॅरिकेट्स तोडले आणि राजस्थान सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. भाजपाने हा मुद्दा विधानभवनातदेखील उपस्थित केला आहे. या रोगाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी एका भाजपा आमदाराने विधानभवन परिसरात गायीला आणत रोगाची भीषणता लक्षात आणुन दिली. दरम्यान, या रोगाला केंद्र सरकारने राष्ट्रीय आपत्ती घोषित करावी, अशी मागणी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी केली आहे.
“गायींचा जीव वाचवणे आमची प्राथमिकता आहे. केंद्र सरकारने त्यासाठी लस आणि औषधं पुरवावीत”, असे गेहलोत म्हणाले आहेत.
लम्पी आजारामुळे जयपुरातील दूध संकलनाला फटका बसला आहे. यामुळे राज्यात उत्पादित मिठाईच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे. दूध संकलनात १५ ते १८ टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे वितरणात अडचणी येत असल्याची माहिती ‘जयपूर डेअरी फेडरेशन’ने दिली आहे
लम्पी या रोगाचा प्रसार देशातील १३ राज्यांमध्ये झाला आहे. या रोगाचा सर्वाधिक फटका राजस्थानला बसला आहे. लम्पी रोगाचा सामना करण्यासाठी अतिरिक्त मदत आवश्यक असल्याचे अशोक गेहलोत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. या रोगाच्या लशीची निर्मिती झाल्यानंतर राजस्थानला प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी गेहलोत यांनी केली आहे.



# फेसबुकच्या नामांतरानंतर मार्क झुकेरबर्ग यांना आर्थिक फटका

आधुनिक केसरी न्यूज


**नवी दिल्ली :** झुकेरबर्ग यांनी आपल्या कंपनीचे नाव मेटावर्स केल्यानंतर त्यांना मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. कंपनीच्या नामांतरानंतर झुकेरबर्ग यांच्या संपत्तीत या वर्षात ७१ बिलियन डॉलर्सची घसरण झाली असल्याचे पुढे आले आहे. या घसरणीनंतर त्यांची संपत्ती ५५.९ बिलियन डॉलर्स असून अब्जाधिशांच्या यादीत ते २०व्या स्थानावर आहेत.
दोन वर्षांपूर्वी मार्क झुकेरबर्ग यांची संपत्ती १०६ बिलियन डॉलर्स एवढी होती. मात्र, त्यांनी त्यांच्या कंपनीचे नाव फेसबूक आएनसी वरून मेटावर्स केले. त्यानंतर त्यांना अनेक आर्थिक संकटांचा सामना करावा लागतो आहे. ब्लूमबर्गच्या रिपोर्टनुसार २०२२ च्या पहिल्या सहामाहित जगभरातल्या पहिल्या ५०० अब्जाधिशांना १.४ ट्रिलियन डॉलर्सचे नुकसान झाले आहे.
काही दिवसांपूर्वीच ॲमेझॉनचे प्रमुख जेफ बेझोस आणि लुई वित्तॉनचे बर्नाड आरनॉल्टला मागे टाकत भारतीय उद्योपती गौतम अदानी हे जगातील सर्वात श्रीमंत उद्योजक बनले आहेत. फोर्बच्या यादीनुसार गौतम अदानी यांची संपत्ती १५४.७ अमेरिकी डॉलर्स एवढी असून ते दुसऱ्या स्थानावर आहे. तर २७३.५ अब्ज अमेरिकी डॉलर्ससह इलॉन मस्क हे पहिल्या स्थानावर आहेत.




# 'शिवतीर्थ'वर मोदींचा आवाज घुमणार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे सध्या विदर्भ दौऱ्यावर आहेत. नागपूरनंतर ते आज चंद्रपूरमध्ये दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी पोहोचले आहेत. या दौऱ्यानंतर राज ठाकरेंच्या शिवतीर्थ या निवासस्थानी आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आवाज ऐकायला येणार आहे. चंद्रपूर दौऱ्यावर असलेल्या राज ठाकरे यांना भाजप नेते आणि मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एक खास गिफ्ट दिलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं भाषण ऐकू येणारी एक खास भेटवस्तू सुधीर मुनगंटीवार यांनी राज ठाकरे यांना दिली आहे. त्यामुळे राज ठाकरेंच्या शिवतीर्थवर आता मोदींचा आवाज ऐकायला येणार आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून राज ठाकरेंना सदिच्छा भेट म्हणून एक स्केच आणि एक पत्र फ्रेम करुन दिलं आहे. त्यासोबत एक राष्ट्रध्वजाचं सन्मानचिन्ह देण्यात आलं आहे. या सन्मान चिन्हामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचं एक रेकॉर्डेड घोषणा ऐकू येत आहे. "वंदे मातरम" अशी ती घोषणा आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# चिपको आंदोलन

## एक लढा असाही (भाग-3)

आधुनिक केसरी

हिमालयातील वृक्षतोडीचा परिणाम गावागावांवर होऊ लागला. गढवाल-कुमाऊं परिसरातील आठ हजार फूट उंचीवर वसलेले लस्यालगाव गाव नावाचे एक छोटेसे पहाडाच्या कुशीत बसलेले निसर्गरमय गाव. वस्ती जेमतेम पन्नास-शंभर घरांची. डोंगरउतारावर शेती करून त्यावर उपजीविका करणे यावरच तेथील लोकांचे जीवन आधारले होते. डोंगरावरून खाली वाहत येणाऱ्या ओढ्यांमुळे गावात पाण्याची कमतरता नव्हती. त्याच ओढ्यांच्या पाण्यावर उतारावरची शेतीही पिकत होती. पण जसजशी डोंगरावरील झाडे नष्ट होत गेली, मातीचे संरक्षक आवरण नष्ट होत गेले तसतसे हे जीवनदायी असणारे ओढे जीवघेणे ठरू लागले. दोन्ही काठांच्या मधून नियमितपणे वाहणाऱ्या ओढ्यानी काठाची बंधने झुगारून दिली. आजूबाजूच्या डोंगरउतारावर असणाऱ्या छोटया छोट्या शेतांवर त्यांनी आक्रमण केले. तेथील माती, पिके उध्वस्त केली आणि आधीच



जगण्याची मर्यादित साधने हाती असणाऱ्या गावकऱ्यांच्या तोंडाचा घास हिरावून घेतला. अशी हिमालयातील अनेक गावं. लोकांच्या हाती उपजीविकेची साधने न उरल्यामुळे आपलं गाव, आपल्या जमिनी सोडाव्या लागल्या. वर्षानुवर्षे आपला रहिवास असलेला परिसर सोडून हाती असलेल्या चार दोन भांड्यांसह आणि कच्याबच्यांसह मुलुख सोडण्याचे दुःख काय असते ते अशा लोकांनाच माहिती ! शहरात सुखाने कालक्रमणा करणाऱ्या तुमच्या आमच्यासारख्याना त्याची धग जाणवणार नाही. असेच नैसर्गिक आपत्तीची झळ सोसलेले चामोली जिल्ह्यातील चंडिप्रसाद भट आणि त्यांचे गावकरी. आपल्यावरील संकटाने एकत्र आले. व्यापक रस्तेबांधणी मोहीम सुरु होती. अशा वेळी त्यांनी स्थानिकांना रोजगार मिळावा म्हणून सहकारी मजूर समितीची स्थापना केली. ही मंडळी सर्वोदयवादी जयप्रकाश नारायण आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सहवासात आली. त्यामुळे या विपरीत परिस्थितीविरुद्ध लढण्याची हिंमत त्यांना या कार्यकर्त्यांकडून मिळाली. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## डोळ्यांवरील विश्वासाची झापडे भ्रमात अडकवतात

आधुनिक केसरी

आपल्याला आयुष्य जगण्यासाठी जसा श्वास गरजेचा असतो, तसाच आपल्या आयुष्यात जगण्यापलीकडचे जीवन जगण्यासाठी विश्वास महत्वाचा असतो. आपल्या जीवनांत आपल्याला लाभलेले जाज्वल्य हे फक्त श्वास-विश्वासावरच अवलंबून, टिकून रहात असते. श्वसन प्रकाराच्या उपयोगातून आपले जगणे अधिक सुलभ, सुरक्षित आणि सुंदर करणे आपल्यावरच अवलंबून असते. जितका मोठा श्वास घेतला जातो तितकेच आयुष्य मोठे, दीर्घ होत जाते. ह्या श्वासावर नियंत्रण करण्याचे शास्त्र आपण अवगत केले, कि समजायचे, आपण आपल्या जगण्यावर विजय मिळवला. खरे तर अगदी सहज आणि नकळत घेतलेल्या श्वासाचे किती महत्व असते, हे समजून घेण्याची जाणीव होणे जरुरीचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

नकळत केलेल्या अनेक गोष्टी आपल्याकडून अनेकदा दुर्लक्षित रहात असतात. श्वास आणि विश्वासाचे देखील तसेच असते. श्वास-विश्वासाच्या बाबतीत खरेच आपण नेहमीच गाफील रहात असतो, हीच खरी उणिव म्हणावी लागेल. अनेकदा आपल्या बाबतीत जसे श्वासाचे, तसेच विश्वासाचे सुद्धा असते. आपण अगदी सहजपणे केवळ दृश्य पण आभासी जगावर आंधळेपणाने विश्वास टाकत असतो. आपल्या डोळ्यांवर चढलेली विश्वासाची झापडे आपल्याला भ्रमांत अडकवतात. आपल्याला अगदी नुकत्याच भेटलेल्या व्यक्तीबरोबर, एखाद्या योजनेसाठी, जाहिरातींना भुलून जाऊन आपले सर्वस्व सुद्धा अर्पण करायला तयार होतो. अगदी काही क्षणांत, काही काळांत आपण त्यांवर विश्वास ठेवतो आणि व्यवहार करून मोकळे होते. पण हे मोकळे होणे आपला खिसा, तिजोरी देखील मोकळे करत आहे ह्याची जाणीवही होत नाही. आपण म्हणतो, कि आपण माणसे ओळखायला चुकत नाहीत म्हणून; परंतू त्याच माणसांचे मन ओळखू शकत नाहीत, हीच शोकांतिका ठरते.



आधुनिक केसरी

## सत्कर्माचे फळ | मोक्ष देई ||

कोणाच्या धनाचा | कोण रे मालक ||
सत्तेचा चालक | विश्वंभर ||१||

भाड्याचे हे घर | विसर पडला ||
विषयी ग्रासला | उभा जन्म ||२||

उधारीचे श्वास | सत्कर्म किराया ||
परी मोह-माया | मेळ नाही ||३||

जप्ती येते घरा | वाढता उधारी ||
श्वास हा माघारी | काळ नेतो ||४||

सावध हो वेड्या | घाल ताळमेळ ||
सत्कर्माचे फळ | मोक्ष देई ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


**जगदम्ब नमस्तुभ्यं जगदुत्पत्तिहेतवे।**
**मोहकर्त्रि नमस्तुभ्यं मोहविनाशकारिणि ।।११।।**
या जगताच्या उत्पत्तीचे कारण अशा तुला हे जगदंबिके, तुला नमस्कार असो. मोह करणारे आणि मोहाचा विनाश करणारे तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं माये विश्वस्य पालिके।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं माये सन्तापनाशिनि ।।१२ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. जगदंबे, माये, विश्वपालिके, तुला नमस्कार असो. जगदंबिके, माये, संतापाचा नाश करणारे, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं मातापुरनिवासिनि।**
**नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं श्रीरेणुके नमो नमः ।।१३ ।।**
माहूर क्षेत्री निवास करणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. हे रेणुके तुला वारंवार नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं मतिरूपाय ते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं शक्तिरूपाय ते नमः।।१४ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझ्या बुद्धीरूपाला नमस्कार असो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझ्या शक्तीरूपाला नमस्कार असो.

# ।। दासबोध स्तवन ।।



## दृश्यनिरसन

आधुनिक केसरी

समर्थांनी एकुण 50 ओव्यात हा समास गुंफलेला आहे. आपण 18 व्या ओवी पर्यन्त अभ्यासले आहे की जे डोळ्यांनी दिसते ते सर्वच खरें आहे असे नसते. काही गोष्टी तर्काच्याही पुढे गेलेल्या असतात. त्यासाठी समर्थांनी एक साधं ऊदाहरण दिलं आहे ते म्हणतात की आपल्या हातात दोनचार लहान आरसे घ्यावे. प्रत्येक आरशात आपलं प्रतिबिंब दिसते तो अभास असतो. आपलं एक तोंड हेच खरं आहे. प्रत्येक आरशात आपलं तोंड दिसतं यालाचं समर्थ "मायेचा बाजार"असं म्हणतात.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आता आपण परंपरागत वेदांताप्रमाणे सांगायचें म्हणजे श्री समर्थांनी दिलेल्या ऊदाहरणात बिंब--प्रतिबिंबवाद व अभासवाद प्रामुख्याने स्विकारले आहेत. पहिला वाद असे सांगतो की,निर्मळ वस्तुमध्ये प्रतिबिंब पडते. बिंबच षहजपणे प्रतिबिंबलेले दिसते. प्रतिबिंब म्हणजे काही नवीन निर्माण झालेली दुसरी वस्तु नव्हे. प्रतिबिंब पाण्याच्या आधी,प्रतिबिंब म्हणजे काही नवीन निर्माण झालेली दुसरी वस्तु नव्हे. प्रतिबिंब हे पहाण्याच्या आधीं,प्रतिबिंब पडलेले असतां,आणि प्रतिबिंब नसल्यवर मुळ बिंब अगदी जसेच्या तसेचं रहाते. म्हणजे आपण ईथे पाण्याचे व आरशाचे ऊदा,घेतले त्यावरून आपण निष्कर्ष काढू शकतो की जे जे शाश्वत आहे ते ते सत्य आहे बाकी सर्व मिथ्या आहे. इंद्रिये व मन दोन्ही अज्ञानातूनचं जन्म पावलेली असतात वस्तु जशी खरोखर आहे तशी त्यांना कधीचं दिसत नाही. आणि मग माणुस कल्पना विलासात रमतो जे खरें नाही ते खरें वाटायला लागते. आणि सगळे जीवन भ्रमाने भरल्याने वाया जाते. आता समर्थ पुढच्याच ओवीत कल्पनावादाचा अनुवाद करतात. हा कल्पनावाद असे सांगतो की माणसाचा जीव हा मुळचा "सच्चिदानंद स्वरूप"आहे. त्याने विपरीत कल्पना केल्यामुळे तो आपले मुळ स्वरूप विसरला आणि देहचं मी आहे या भावनेने अल्प बनला.मी कर्ता आहे असा मिथ्या अभिमान धरून तो समाजात आत्मप्रौढीने वागू लागला. की जे त्याच्याच -हासाला कारणीभूत होते. पण खोटी आत्मप्रोढी ऊराशी बाळगत बसल्याने आयुष्यात मिळणाऱ्या खर्याखुर्या सुखाचा, आनंदाला पारखा झाला. म्हणून नेहमीच सत्संगती मध्ये राहिले पाहिजे. आपण सतत श्रवण मनन चिंतन केले पाहिजे.

# क्षणिक मोह

आधुनिक केसरी

एका नगरात एक पुजारीबाबा राहत होते. शेजारच्या गावातील पुजाऱ्याचे अकस्मात निधन झाल्याने या पुजारी बाबाना त्या गावात पुजारी म्हणून नियुक्त केले गेले. त्यानंतर एकदा त्या गावी जाण्यासाठी पुजारी बाबा बसमध्ये चढले, त्यांनी कंडक्टरला पैसे दिले आणि ते आपल्या जागेवर जाऊन बसले.

कंडक्टरने तिकिटाचे पैसे घेतले व उरलेली रक्कम पुजारीबाबांना परत केली तेंव्हा त्यांच्या असे लक्षात आले की त्यात १० रुपये जास्त आले आहेत. पुजारीबाबांनी असा विचार केला की आता कंडक्टर घाईत आहे तेंव्हा त्यांना थोड्या वेळाने पैसे परत करू या. काही वेळ झाला कंडक्टर अजूनही त्याचे तिकिटे देण्याचे काम करतच होता.

पुजारीबाबांच्या मनात एक विचार आला की आता तर कंडक्टर इतका घाईत आहे कि त्याला ते १० रुपये परत केले काय आणि नाही केले काय काय फरक पडणार आहे. सरकारी बस कंपनी इतके पैसे मिळवते प्रवाशांकडून मग इतक्या छोट्या रकमेने त्यांना काय होणार? लाखो रुपयांचे व्यवहार करणाऱ्या कंपनीकडून हे १० रुपये आपल्या सारख्या पुजाऱ्याला भेट मिळाले असेच आपण समजू. आपण याचा काही तरी सदुपयोग करू शकू.

पुजारीबाबांच्या मनात असे विचार चालू असतानाच त्यांचे उतरायचे ठिकाण आले. बसमधून उतरतांना अचानक



त्यांचा हात खिशाकडे गेला व त्यातून ती दहा रुपयाची नोट त्यांनी बाहेर काढली व कंडक्टरला परत दिली व म्हणाले, "भाऊ...!!" तुम्ही मघाशी मला तिकिटाचे पैसे परत करताना घाईगडबडीत हे दहा रुपये जास्त दिले आहेत."

कंडक्टर हसून म्हणाला,"महाराज! तुम्हीच या गावाचे नवे पुजारी आहात का?" पुजारीबाबा हो म्हणाले.

त्यावर कंडक्टर पुन्हा बोलू लागला," महाराज, माझ्या मनात तुमचे प्रवचन ऐकण्याची खूप इच्छा होती. तुम्हाला बसमध्ये चढताना पाहिले आणि मनात एक विचार आला की चला आपल्याला या कामामधून वेळ मिळत नाही आणि तुमची भेट घडून येत नाही तेव्हा तुम्ही जसे प्रवचनात उपदेश करता ते आचरणात आणता काय याचा पडताळा घ्यावा म्हणून मी ते दहा रूपये तुम्हाला मुद्दाम जास्त दिले होते. पण मला आता कळून चुकले आहे की तुम्ही जसे बोलता तसेच तुमचे पवित्र आचरण आहे. महाराज मला क्षमा करा." एवढे बोलून कंडक्टरने गाडी पुढे जाण्यासाठी बेल वाजवली.

पुजारीबाबांना आता घाम फुटला होता, ते घाम पुसत आकाशाकडे पहात म्हणाले," प्रभो, तुझी लीला अपरंपार आहे, दहा रूपयांचा मोह मला आत्ता किती महागात पडू शकला असता पण तुम्ही मला त्यातून वाचवले. देवा तू खरंच दयाळू आहेस. अचानक का होईना त्या दहा रूपयांच्या मोहातून तू मला बाहेर काढले व समाजात होणारी माझी बदनामी थांबवली."

**तात्पर्य** : स्वार्थ,मोह हा वाईट असतो, ज्याक्षणी मोहाने मन ग्रासते त्याक्षणीच मानव प्रगतीकडून अधोगतीकडे प्रवास करू लागतो.त्यामुळे नेहमी प्रामाणिक रहा.

# नैतिकता वाढविण्यासाठी विद्वानांनी विचार पेरण्याची गरज

## चंदिगढ येथील विद्यार्थिनीचे अंघोळीचे चित्रफीत व्हायरल प्रकरण

आधुनिक केसरी

पंजाबच्या चंदिगढ विद्यापीठातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींच्या अंघोळीच्या चित्रफिती व्हायरल झाल्याच्या प्रकरणाने समाजमन अस्वस्थ झाले आहे. सोशल मिडियाचा वापर सकारात्मकतेने व्हावा अशी अपेक्षा असताना त्याचा नकारात्मक वापर करुन नैतिक मूल्ये पायदळी तुडवली जात आहेत. एकंदरीत ही घटना दुदैवी असतानाच यातून माणूस,माणुसकी आणि माणसांच्या प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उभा राहिले आहे. ते बदलण्याची आज गरज असून त्यासाठी समाजातील विद्वानांनी विचार पेरण्याची गरज असून अशा प्रवृत्ती वेळीच ठेचून काढण्याची आवश्यकता अनेक मान्यवरांकडून आधुनिक केसरीशी संवाद साधत व्यक्त केली.




### समाजाची नैतिकता वाढविण्याची गरज..



चंदिगढ विद्यापीठात ज्या प्रवृत्तींनी हे कृत्य केले त्यांची विकृत मानसिकता समोर येते. त्यांची नैतिक मूल्ये खालच्या दर्जाची असल्याचे दिसून येते. ही मुख्यतः प्रथम समस्या आहे. कुणाला तरी नग्न अवस्थेत पाहणे,अशा प्रकारचे लैंगिक सुख डोळ्यासमोर ठेवणे हा एक प्रकारे विकृत आनंद आहे. कोणतीही टेक्नॉलॉजी असो त्याचा वापर होतो तसेच गैरवापरही होतो. समाजात विकृत लोकांचा एक कळप असतो. समाजाची जशी प्रगती झाली तशाच प्रकारे समाजाची नैतिकताही घसरली. म्हणून समाजाची नैतिकता वाढविण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

- डॉ. अविनाश जोशी
प्रसिद्ध मानसोपचारतज्ञ, नागपूर

### व्यवस्थेच्या राखेचे विसर्जन करण्याची वेळ आली...



चंडीगढ़ यूनिवर्सिटी मध्ये घडलेली घटना ही मानवतेवर आणि सुशिक्षित आणि पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या समाज व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह आहे. आजही समाजात स्त्री सुरक्षित नसून तिचे चारित्र्यहनन ही पुरुषसत्ताक समाजाची मर्दुमकी ठरते आहे हे फार विदारक आहे. माणसांच्या संवेदनशीलतेवर घाला घालणाऱ्या या घटना म्हणजे विकृतीकरणाचा एक उंच गाठलेला कळस आहे. हे महासत्तेचे स्वप्न रंगवणा-या देशाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे असेच आहे. शिक्षण क्षेत्रातील अश्या घटना शिक्षण व्यवस्थेसह, न्याय व्यवस्था, लिंगसमभाव आणि आपल्या उदात्त संस्कृतीचा गाजावाजा करणारे संस्कारी समाजमन इत्यादीबाबत प्रश्न उभे करतात. निर्भया, खैरलांजी, कोपर्डी प्रकरणे घडूनही समाजास जाग येत नसेल तर ह्या समाज व्यवस्थेच्या राखेचे विसर्जन करण्याची वेळ आलीआहे असे म्हणावे लागेल.

-किरण शिवहर डोंगरदिवे
(काव्यप्रदेशातील स्त्री ह्या स्त्री दुःखाचे धागे शोधणाऱ्या ग्रंथाचे ग्रंथकार) मेहकर



### सोशल मिडीयावर कठोर बंधने घाला..



नैतिकता सुखाच्या गोष्टीशी जुळलेली आहे. आंबटशौकीन माणसांची नैतिकता -हास झालेली असते. सध्या समाजात सर्वसामान्य माणसांची नीतिमूल्ये घसरगुंडीवर गेली आहेत. आणि त्यातून हे होत असलेले गलिच्छ प्रकार चिड आणणारे वाटतात. म्हणून सोशल मीडियासाठी कठोर कायदा करण्याचीच आज गरज आहे. वास्तवात समाजाने या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन संवेदनशील विचार करणे आवश्यक आहे.

- प्रमोद कुलकर्णी
संवेदनशील नागरिक
मुंबई.

### नैतिकतेला वेशिला टांगणा-यांना आवरा...



चंदीगड लेडीज हॉस्टेल मध्ये झालेली जी घटना आहे ती अतिशय निंदनीय आहे .एक स्री ही दुसऱ्या स्त्रीची वैरीण झाली आहे असे इथे दिसत आहे.कारण आजकाल सोशल मीडियाच्या युगात सोशल मीडियाचा वाजवीपेक्षा जास्त वापर करणे घातक ठरले आहे. आई-वडिलांनी कुणाच्या भरोशावर मुलींना होस्टेलला पाठवावे हा प्रश्न आहे. जर हॉस्टेलमध्ये असे प्रकार चालत असतील तर मन विषण्ण झाले. म्हणून अतिशय विघातक वळणावर आज समाज उभा राहिला आहे. नैतिकतेचे कंगोरे वेशिला टांगून सैरभैर वावरणाऱ्या अशा प्रवृत्तीना वेळीच आवरण्याची आज गरज आपल्यावर येऊन पडली आहे.

सौ. सीमा देशमुख
प्रसिद्ध लेखिका, अमरावती.

### अशा प्रवृत्ती वेळीच ठेचून काढा...



चंदिगढ विद्यापीठाच्या वसतीगृहातील अश्लील चित्रफित प्रकरणाने देशाची शरमेने मान खाली गेली आहे. लैंगिक दुराचार, आणि स्त्री पुरुष समानतेची क्रुरता या दोन्ही बाबीतील संवेदनशीलतेचे हळवेपण हरवलेले दिसते. जगण्याच्या नैतिक मूल्यांवर असेच हल्ले माणूस चढवत गेला तर आपला विनाश व्हायला काहीच वेळ लागणार नाही. त्यामुळेच हे प्रकरण लज्जास्पद आणि तेवढेच निषेधाचे आहे. तेव्हा हे प्रकार घडवणा-या प्रवृत्ती वेळीच ठेचून काढण्याची मोठी जबाबदारी आता समाजावर आली आहे.

- दत्ताबापू काळुंके
सामाजिक कार्यकर्ते
मुंबई.

# वेदांता प्रकल्प जाणे हे पाप शिंदे - फडणवीस सरकारचे - जयंत पाटील



आधुनिक केसरी

**नांदेड :** वेदांता प्रकल्प इतर राज्यात गेल्याने अनेक तरुणांना नोकरीला मुकावे लागले आहे. हे पाप शिंदे - फडणवीस सरकारचे आहे अशी जोरदार टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी नांदेड येथे केली.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी काल (सोमवारी) परभणी जिल्हा केल्यानंतर आज हिंगोली आणि नांदेड जिल्हयाची आढावा बैठक घेतली. आघाडी सरकारबद्दल जे राजकारण शिंदे - फडणवीस सरकारने केले ते सर्वसामान्य जनतेला पटलेले नाही. त्यांच्या विषयी जनतेत रोष आहे असे मतही जयंत पाटील यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रात जे सत्तेत आहेत ते असमाधानी आहेत. त्यांचे त्यांना माहिती नाही की आपण कधीही अपात्र ठरू. जे लोक पक्षांतर करून जातात त्यांच्यापेक्षा सामान्य सैन्यमहत्त्वाचे आहे. त्यांचे बळकटीकरण झाले पाहिजे असेही जयंत पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. आपण मोठ्या संख्येने सभासद नोंदणी केली तर भविष्यात नांदेड जिल्ह्याला विशेष ताकद दिली जाईल. पक्षातंर्गत निवडणुकीत स्थानिक स्तरावर निर्णय घेऊन सर्वमान्य अध्यक्ष निवडले जातील असेही जयंत पाटील यांनी सांगितले. ज्याला पक्षात स्थान मिळवायचे असेल त्यांनी सभासद नोंदणी केली पाहिजे. काम करणार्‍या व्यक्तीला आभाळ हे ठेंगणे असते. योग्य माणसांना संधी देण्याचे काम प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस नक्कीच करेल असा विश्वासही जयंत पाटील यांनी दिला. यावेळी माजी खासदार कमलकिशोर कदम आणि माजी खासदार जयसिंग गायकवाड यांनी आपले विचार मांडताना कार्यकर्त्यांनी पवारसाहेबांचे विचार, पक्षवाढीसाठी सदैव तत्पर असले पाहिजे असे स्पष्ट केले.

यावेळी माजी खासदार जयसिंगराव गायकवाड, माजी खासदार कमलकिशोर कदम, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे, जिल्हाध्यक्ष हरिहर भोसीकर,माजी आमदार शंकरराव धोंडगे, अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष मोहमद खान पठाण, निरीक्षक आशा भिसे, युवक अध्यक्ष रौफ जमिनदार, सुनील कदम, महिला जिल्हाध्यक्षा प्रांजल रावणगावकर, माजी आमदार प्रदिप नाईक, युवक जिल्हाध्यक्ष धनंजय सुर्यवंशी, प्रशांत कदम, नितीन वाघमारे, युवती जिल्हाध्यक्षा प्रियांका कैवारे, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष अजिंक्य देशमुख, कन्हैया कदम, आदी उपस्थित होते.

# अरविंद केजरीवाल यांची भाजपावर आगपाखड

आधुनिक केसरी

**दिल्ली :** आम आदमी पक्षाचे संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल गुजरातच्या वडोदरामध्ये दाखल झाले आहेत. आम आदमी पक्ष बुक करु इच्छित असलेल्या १३ सभागृहांच्या मालकांना भाजपाने धमकावल्याचा आरोप केजरीवाल यांनी केला आहे. पक्षाच्या कार्यक्रमासाठी या सभागृह मालकांसोबत आपचे कार्यकर्ते संपर्कात होते. ही भाजपाची गुंडागर्दी असल्याचा आरोप केजरीवाल यांनी केला आहे. त्यांनी १३ सभागृह मालकांना धमकावले आहे. आम्ही कार्यक्रमासाठी जागा निवडताच ही जागा आपच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध नाही, असे सांगण्यात येत होते. यामुळे आम्हाला १३ वेळा जागा बदलावी लागली", असे माध्यमांशी बोलताना केजरीवाल यांनी सांगितले आहे. "ही कृती योग्य नाही. आम्ही शत्रू नाही तर प्रतिस्पर्धी आहोत. तुम्ही तुमचे राजकारण करा, मला माझे करू द्या. भाजपाच्या या गुंडागर्दीला गुजरातमधील जनता त्रस्त झाली आहे", अशी टीका केजरीवाल यांनी केली आहे.



# IRCTC ची नवरात्री भेट



आधुनिक केसरी

नवरात्री हा सण आता अवघ्या काही दिवसांवर आला आहे. लवकरच गरब्याचा आवाज आपल्या कानांमध्ये घुमू लागेल. नवरात्रीच्या दिवसांमध्ये गरबा खेळणाऱ्यांची संख्या जितकी मोठी आहे तितकीच उपवास करणाऱ्यांची संख्याही जास्त आहे. या काळात लोक कडक उपवास करतात. मात्र, उपवास करत असताना आपल्याला लांबचा प्रवास करावा लागला तर? अशा प्रवासात उपवास करणाऱ्यांची खूपच पंचाईत होते. मात्र आता काळजी करण्याची गरज नाही. कारण आयआरसीटीसीने (IRCTC) रेल्वे प्रवाशांना नवरात्रीची खास भेट दिली आहे. भारतीय रेल्वेने नवरात्र स्पेशल मेन्यूला मंजुरी दिली आहे. यानुसार रेल्वेमध्ये उपवास करणाऱ्या प्रवाशांना फलाहाराबरोबरच उपवासात खाण्याचे पदार्थ दिले जाणार आहेत. भारतीय रेल्वेच्या प्रमुख गाड्यांच्या पॅन्ट्रीमध्ये फलाहाराची व्यवस्था केली जात आहे. एवढेच नाही तर याची शुद्धता राखण्यासाठी नवरात्रीच्या काळात पॅन्ट्रीमध्ये मांसाहारी पदार्थ तयार केले जाणार नाहीत. आयआरसीटीसीने 'सप्तक्रांती' आणि 'वैशाली सुपरफास्ट' सारख्या प्रमुख गाड्यांच्या पॅन्ट्रीकार ऑपरेटरच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. यंदा २६ सप्टेंबरपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होणार आहे. या उत्सवात अनेक घरांमध्ये घटस्थापना तसेच कुलदेवतेची पूजा केली जाते. यादरम्यान शहरात राहणारे लोक आपल्या घरी जातात. अशा परिस्थितीत उपवास करणाऱ्या लोकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी आयआरसीटीसीने 'सप्तक्रांती' आणि 'वैशाली सुपरफास्ट' सारख्या प्रमुख गाड्यांच्या पॅन्ट्रीकार ऑपरेटरच्या 'नवरात्र स्पेशल मेन्यू'च्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सप्तक्रांती एक्स्प्रेसचे पॅंट्री कार व्यवस्थापक असगर अली सांगतात की, नवरात्रीत तयार होणारे अन्न शुद्ध आणि सात्विक असेल. उपवास करणाऱ्यांना चार प्रकारच्या थाळी दिल्या जातील. २६ सप्टेंबरपासून ही सेवा दिली जाणार आहे. कशी मागवता येणार थाळी?आयआरसीटीसीची ही सुविधा ४०० स्थानकांवर उपलब्ध असेल. ही प्लेट ऑर्डर करण्यासाठी प्रवाशाला १३२३ या क्रमांकावर कॉल करून बुकिंग करावे लागेल. मग काही वेळाने, एक स्वच्छ उपवास थाळी तुमच्या सीटवर पोहोचेल. गेल्या वर्षीही अशी व्यवस्था करण्यात आली होती. या थाळीमध्ये हे पदार्थ असतील... फळ, भोपळ्याचे पकोडे, दही : ९९ रुपये, २ पराठे, बटाट्याची भाजी, साबुदाण्याची खीर : ९९ रुपये, ४ पराठे, ३ भाज्या, साबुदाण्याची खिचडी : १९९ रुपये, पनीर पराठा, व्रत मसाला, शिंगाडा आणि आलू पराठा : २५० रुपये.

# लाजिरवाणी बातमी




डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**गेल्या काही दिवसांतील बातम्या विषण्ण करणाऱ्या आहेत. चंडीगढ येथील कॉलेजमधील हॉस्टेलच्या साठेक मुलीचे आंघोळ करतानाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालेत. हे व्हिडिओ एका मुलीने काढले हे आणखीन एक आश्चर्य. बलात्कार झाला तर मुलाला दोषी धरले जाते. इथे मुलीनेच अश्लील शूटिंग केले! अशा घटना वाढल्या आहेत. तरुण मुले, मुली विचित्रासारखी वागताहेत. ई-सिगारेट घेणाऱ्या मुला-मुलींचे प्रमाण वाढत असल्याची बातमी मुंबईची आहे. घरून पैसे मिळाले नाहीत तर आई- वडिलांचा चक्क खून होणे, प्रेम प्रकरणातून हत्त्या, आत्महत्या होणे हे प्रकार वाढताहेत.**

तरुण पिढी नैराश्याने ग्रासली आहे. त्यांचे मानसिक संतुलन बिघडत चालले आहे. पालक, शिक्षक, समाज शास्त्रज्ञ, मानस शास्त्रज्ञ सर्वांनीच यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कोण चुकतो यापेक्षा तो का चुकतो याचा शोध जास्त महत्वाचा. इथे कुठेतरी संस्कार कमी पडताहेत. शिक्षव्यवस्थेतील,राजकारणातील नीतीमत्तेची घसरण हेही महत्वाचे कारण आहे. मुले मुली अवती भवती काय दिसते, अनुभवाला येते त्यानुसार वागतात. विचार करतात. पालकांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. उलट काही बाबतीत शिस्तीचा अतिरेक देखील होतो. संवाद कमी अन् वादविवाद जास्त अशीच परिस्थीती घरोघरी दिसते. आई वडील मुलासमोरच मोठमोठ्याने भांडतात.. क्वचित हिंस्त्र होतात. काही घरी तर आई वडिलांबरोबर एकाच टेबलवर मुलेही दारू प्यायला बसतात .हे आधुनिकतेचे लक्षण समजले जाते. अशा पार्ट्या कॉमन झाल्या आहेत. मुलाच्या वाढदिवसाच्या पार्टीचे स्वरूप बदलले आहे. एकीकडे गरिबी आहे हा कांगावा. जो तो मागासलेला म्हणून सवलती, आरक्षण मागायचे अन् दुसरीकडे बुलेट वर भटकत पार्ट्या करत मौज मजा करायची. विद्यार्थी कॉलेजमध्ये कमी दिसणार. बाहेर मित्रांच्या घोळक्यात मौज मजा करीत टाईमपास करणार असेच चित्र दिसते. मॉलमधली गर्दी काय सांगते? कुठे कशाचा धरबंध राहिलेला नाही, अशी परिस्थिती आहे. कुणालाच कुणाचा धाक राहिलेला नाही. मुले आई-वडिलांना जुमानत नाहीत. शाळा कॉलेजात शिक्षक, प्राध्यापकांचा धाक नाही. सर्रास कायदा हातात घेतला जातो. गुंडगिरी वाढली आहे. राजकीय पक्षाच्या युवा संघटनांची त्याला साथ आहे. गळ्यात उपरणे, हाती झेंडा घेतला की कुणीही कार्यकर्ता होतो. मग युवा नेता. मग मोर्चात पुढारी. म्हणजे राडा करण्याचे लायसन्स. इथे पोलीस, कायदा कुणाचाच धाक नाही. छूट जायेंगे ही खात्री. व्यवस्था देखील अशी की वरून फोन आले की तपास थंडावणार. केसेस मागे घेतल्या जाणार. त्यातही जाती पातीचे गणित असले की समीकरण बदलणार. चोर सोडून सन्याशाला पकडणार. गुन्हेगार ठरवणार! नीती अनीतीच्या व्याख्याच आता पार बदललेल्या आहेत. कायदा कसाही वाकवल्या जाऊ शकतो. कोणत्या कलमाचा कसा अर्थ लावायचा ते ठरविण्यासाठी हुशार वकील हाताशी असला की पुरे! कुणावर कसा विश्वास ठेवायचा हेच आता विचारवंतांना कळेनासे झाले आहे.



WORTH READING TWICE

What Is Education?

At the end of World War II, this letter was found in a Nazi concentration camp. It is addressed to Teachers.

Dear Teachers,

I am a survivor of a concentration camp. My eyes saw what no man should witness: Gas chambers built by learned engineers, children poisoned by educated physicians, infants killed by trained nurses. Women and babies shot and burnt by High School and College Graduates. So, I am suspicious of education. My request is: Help your students become human. Your efforts must never produce learned monsters, skilled Psychopaths, educated illiterates. Reading, writing, arithmetic are important only if they serve towards making our children more humane.

हे आपल्याच देशात चाललेय असेही नाही. हा ग्लोबल फेनोमना आहे. परदेशात दहा-बारा वर्षांची मुले शाळेत गन चालवताहेत. रस्त्यांवर बेछूट गोळीबार करताहेत. ड्रग च्या आहारी गेली आहेत. मानसिक संतुलन गमावून बसली आहेत. फ्री सेक्स, लिव्ह इनची भानगड आहेच.हे लोण आपल्याकडेही आले आहे.हिंसाचार, खून, आत्महत्या, बलात्कार यांची कारणे, पार्श्वभूमी तपासा. धक्कादायक खुलासे होताना दिसतात. ऐकून, पाहून डोळे पांढरे व्हायची वेळ येते सभ्य माणसावर. पण कुणाला काय त्याचे? सगळेच आता निर्ढावल्यासारखे झालेत. संवेदनाच हरवली की काय असे वाटते. आपल्या भावना बोथट होत चालल्या आहेत. आता अशक्य असे काही राहिलेच नाही. काहीही होऊ शकते. आपण त्यासाठी तयार राहिले पाहिजे असेच या घटना सांगतात. आलिया भोगासी असावे सादर,तसे!

शिक्षणाकडे होणारे सरकारचे, समाजाचे, पूर्णतः दुर्लक्षच यासाठी कारणीभूत आहे. संस्कार, नैतिकता, निष्ठा, साधना, तपश्चर्या या पूर्वी शिक्षणासाठी आवश्यक घटकांची हकालपट्टी झाली आहे. नोकरीसाठी शिक्षण हेच उद्दिष्ट झाल्याने गुण, परसेंटेज, श्रेणी, परीक्षा ही उद्दिष्ट जास्त महत्वाची. शिवाय अवतीभवतीचे राजकीय, सामाजिक वातावरण पार गढुळलेले. तिथे तर नीतिमत्ता, खरेपणा, कायद्याचे पालन या संज्ञाना पूर्ण सोडचिठ्ठी दिलेली! मुलांनी हिरो म्हणून कुणाकडे बघायचे? कुणाला आदर्श मानायचे? पुतळे, स्मारके जागोजागी, गल्लोगल्ली आहेत. पण त्या निर्जीव वस्तूचा काय उपयोग. आपण महनीय व्यक्तीचे विचार पायथ्याशी गाडले.. अन् त्यावर पुतळे उभारले. विचार मागे राहिला त्या महान पुढाऱ्यांचा. भिंतीवर हार घालण्यासाठी फोटो तेवढे राहिले मागे!

पूर्वी चळवळी व्हायच्या. त्यात जोश असायचा. नवा सर्व समाजाला पोषक असा सृजनात्मक विचार असायचा. खंबीर,नीतिमान, वैचारिक नेतृत्व असायचे. भारावलेपण असायचे. मंत्रमुग्ध करणारी भाषणे असायची. अशा चळवळीत, मोर्चात मुले गेली तरी पालक निर्धास्त असायचे. आता मुलं घराबाहेर गेलीत की येईपर्यंत काळजीच! ती कुठे जातात, काय करतात, त्यांचे मित्र कोण हे विचारायची मुभा नाही. प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य हवेय. जबाबदारी नको. परिणामाची चिंता नको.. हात पोळले की मग खडबडून जागे व्हायचे.. वेळ निघून गेल्यावर! अब पछताये होत क्या जब चिडिया चुग गयी खेत.. अशी परिस्थिती.. आता स्वातंत्र्य प्राप्तीचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना अशा घटना घडत असतील तर आपण अजून किती मागे आहोत, आपल्याला खऱ्या अर्थाने विकासाचा किती लांबचा पल्ला गाठायचा आहे याची कल्पना येईल.मोबाईल ५जी, लांब लांब रस्ते, मेट्रो ट्रेन, फ्लाय ओव्हर, खाजगी कॉलेजेस, स्वायत्त विद्यापीठे, नवनव्या घोषणा, कर्जमाफी, सवलती अन् मूठभर बिल्डर्स, पुढारी, मंत्री यांची करोडोची संपत्ती म्हणजे विकास नव्हे. इंजिनियर, डॉक्टर,वकील, सीईओ वगैरे होण्यापूर्वी आधी प्रत्येकाने माणूस व्हायला शिकले पाहिजे. कायदे पाळायला शिकले पाहिजे. महिलाचा आदर करायला, नम्र भावाने वागायला शिकले पाहिजे. ज्या मुलीने, मुलाने हे अश्लील व्हिडिओ चित्रित केले, तेच त्याच्या आई बहिणीबाबत झाले तर..? ह्या विचाराने विचलित व्हायला, अस्वस्थ व्हायला शिकले पाहिजे.आपल्या संवेदना, प्रेरणा मृत होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. पालकांनी, शिक्षक, प्राध्यापकांनी देखील तेव्हढेच सजग, प्रसंगी कडक व्हायला शिकले पाहिजे.लाड करणे, सूट देणे याला कुठेतरी मर्यादा हवीच.तुम्ही किती जगता याला अर्थ नाही. कसे जगता, कसे वागता हे जास्त मोलाचे, महत्वाचे. देशाच्या स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करताना माणूस म्हणून आपली लायकी कठोरपणे तपासायची वेळ आली आहे. सुधारणे साठी मुहूर्ताची गरज नाही. शुभस्य शिघ्रम..

# पुतीन : युद्ध जिंकू शकले ना युक्रेनचा ताबा घेऊ शकले.?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**साडेसहा महिन्यांपूर्वी (24 फेब्रुवारी) जेव्हा रशियाने युक्रेनवर हल्ला केला. त्यामुळे रशियासारख्या महासत्तेसमोर युक्रेनसारखा छोटा देश ३-४ दिवसांत गुडघे टेकेल, असे सर्वांना वाटले होते आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन क्रिमियाप्रमाणे युक्रेनला रशियाशी जोडतील. सुरुवातीला युद्ध याच दिशेने जात होते. आणि रशियाने डोनेस्तक, लुहान्स्कचे क्षेत्र स्वतंत्र देश म्हणून घोषित केले. पण 3-4 दिवसात ना युद्ध संपले ना रशियाने युक्रेनवर ताबा मिळवला. आणि आता युक्रेनकडून धक्कादायक दावे केले जात आहेत. त्याच्या मते युक्रेनने नवे वळण घेतले आहे. आणि राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी दावा केला आहे की युक्रेनने सप्टेंबरमध्ये रशियाकडून 6,000 चौरस किलोमीटर जमीन परत घेतली.**

ग्लोबल फायर पॉवर इंडेक्सनुसार, युक्रेन हा जगातील 22 व्या क्रमांकाचा लष्करी क्षमता असलेला देश आहे. तर रशिया त्याच्यापेक्षा अधिक ताकदवान क्रमांक-2 वर आहे. असे असूनही, युक्रेनने नाटो देशांना दिलेला पाठिंबा हे युद्ध लांबण्याचे मुख्य कारण आहे. ज्यामध्ये ड्रोनपासून ते इतर आधुनिक शस्त्रे युक्रेनला खूप उपयोगी पडत आहेत.

युक्रेनने ईशान्येकडील गमावलेली जमीन परत मिळवली आहे आणि रशियन सैन्याने माघार घेतली आहे. सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धात पुतिन यांच्यापुढे कोणते पर्याय उरले आहेत? ते पुन्हा जोमाने हल्ला करतील किंवा तडजोडीचा मार्ग अवलंबतील? रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी ईशान्य युक्रेनमधील त्यांच्या सैन्याच्या विजेच्या वेगाने खंडित होण्यावर अद्याप सार्वजनिकपणे भाष्य केलेले नाही, परंतु गमावलेला प्रदेश परत घेण्यासाठी राष्ट्रवादीकडून त्यांच्यावर दबाव वाढत आहे. एपी या वृत्तसंस्थेनुसार, युक्रेनचे मुख्य शहर खार्किव येथील इमारतींवर पुन्हा युक्रेनचे झेंडे फडकत आहेत. आणि रस्त्यावर रशियन जळलेल्या टाक्या पडल्या आहेत. दरम्यान, ब्रिटीश गुप्तचर संस्थेने दावा केला आहे की मॉस्कोच्या मुख्य सैन्यांपैकी एक, फर्स्ट गार्ड्स टँक आर्मी या युद्धात अत्यंत कमकुवत ठरली आहे. एवढेच नाही तर नाटोचा मुकाबला करण्यासाठी तयार करण्यात आलेले रशियाचे पारंपारिक सैन्यही अत्यंत कमकुवत झाले आहे. रशियाला पुन्हा ही पातळी गाठण्यासाठी अनेक वर्षे लागतील. युक्रेनच्या लष्करी गुप्तचर संस्थेने दावा केला आहे की रशियन सैन्याने सामूहिक आत्मसमर्पण केले आहे. युक्रेनचा हा दावा रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने नकाशात मान्य केला आहे. त्यांच्या मते रशियाच्या सीमेवर असा दबाव दिसून येतो. आणि काही भागातून सैनिकांनी माघार घेतली आहे.

जर आपण लष्करी क्षमतेवर नजर टाकली, तर ग्लोबल फायर पॉवर इंडेक्सनुसार, युक्रेन हा जगातील लष्करी क्षमता असलेला 22 वा देश आहे. तर रशिया त्याच्यापेक्षा अधिक ताकदवान क्रमांक-2 वर आहे. असे असूनही, युक्रेनने नाटो देशांना दिलेला पाठिंबा हे युद्ध लांबण्याचे मुख्य कारण आहे. ज्यामध्ये तो युक्रेनला सतत शस्त्रास्त्रांचा पुरवठा करत आहे. यामध्ये ड्रोनपासून ते इतर आधुनिक शस्त्रास्त्रे युक्रेनला खूप उपयुक्त आहेत.

या लढाईच्या सुरुवातीच्या टप्प्यात युक्रेनने अमेरिकेच्या घातक फिनिक्स घोस्ट ड्रोन, बायरेक्टार टीबी-2 ड्रोन, स्विचब्लेड ड्रोनद्वारे रशियन रणगाडे आणि विमानांचे मोठे नुकसान केले आहे. NATO ने जारी केलेल्या माहितीनुसार, NATO देशांकडून युक्रेनला शस्त्रास्त्रे, दारूगोळा, अँटी-टँक आणि अँटी-एअर सिस्टम, हॉवित्झर आणि ड्रोनचा पुरवठा केला जात आहे. HIMARS M-142 रॉकेट सिस्टिममुळे या युद्धाला नवं वळण मिळालं.या सिस्टीम मुळे युद्ध टर्निंग पॉइंटवर आले आहे. जुलैमध्ये युक्रेनने HIMARS M-142 रॉकेट प्रणाली मिळाल्यापासून 50 रशियन दारुगोळा डेपो नष्ट केल्याचे सांगितले. इतकंच नाही तर खार्किव आणि इझ्युममध्ये युक्रेनियन सैन्याची प्रगती हे HIMARS M-142 चे प्रमुख कारण बनले आहे. यूएस आर्मी ऍक्विझिशन सपोर्ट सिस्टीमनुसार HIMARS M-142 ही उच्च गतिशीलता असलेली तोफखाना रॉकेट प्रणाली आहे. जे लाइट मल्टिपल रॉकेट लाँचर आहे. जे सर्व हवामानात हल्ला करण्यास अनुकूल असते. जे शस्त्रांसह 35800 पौंड वजन वाहून नेऊ शकते.

अमेरिकेच्या संरक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने जुलैमध्ये युक्रेनला 16 HIMARS M-142 विमाने देण्याचा निर्णय घेतला. याशिवाय ५८० फिनिक्स घोस्ट ड्रोन देण्याचा निर्णयही घेतला होता.

रशियन सैन्याला रोखण्यासाठी युक्रेनने गनिमी रणनीती अवलंबली आहे.राजधानी कीवसह अन्य शहरांमध्ये रशियन सैन्यासोबतच्या युद्धासाठी लष्कराबरोबरच सामान्य लोकांनाही शस्त्रे देण्यात आली होती. राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी स्वतः रशियन सैन्यावर घरांच्या आतून हल्ला करण्यास सांगितले. रणांगणावर महिलाही रशियन सैन्यासमोर उभ्या राहिल्या. युक्रेनचे खासदार, शहरांचे महापौर, सेलिब्रिटींपासून ते सर्वसामान्यांपर्यंत शस्त्रे घेऊन मैदानात उतरले. आणि या सगळ्याचा परिणाम आता दिसू लागला आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आजच्या शिक्षणाची वास्तवता



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

आजच्या शिक्षणात मनुष्य फक्त सुशिक्षित होतो पण सुसंस्कृत नाही. तसे पाहता शिक्षण हे पवित्र आहे. त्यामुळे ज्यांनी शिक्षण घेतले ते तर शिक्षित असायलाच हवे पण खरे तर ती माणसे ही स्वार्थी व संकुचित वृत्तीचे असतात . हुंड्याची प्रथा सुशिक्षितांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते . अशिक्षित यांच्या घरी पत्नीही गृहलक्ष्मी मानली जाते.शिक्षण म्हणजे आपला स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान होय. पूर्वीच्या काळी प्रत्येक वर्गासाठी भिन्नभिन्न शिक्षण होते .ब्राह्मण वर्गासाठी वेदविद्याचे, क्षत्रिय यांच्यासाठी शास्त्र विद्येचे आणि वैश्य व शूद्र ही आपल्या वाडवडिलांकडून चालत असलेल्या कलेचे शिक्षण घेत असत. पण आता ही शिक्षण पद्धती पूर्णपणे बदललेली आहे.आजचे शिक्षण हे पूर्णपणे पुस्तकी स्वरूपाचे आहे. पुस्तकातील माहिती ठराविक वेळात उतरून काढणे याला परीक्षा या शब्दाचे रूप मिळाले आहे. पुस्तकाबाहेरील कुठल्याही गोष्टीचा विचार करण्याची संधी आजच्या युगात विद्यार्थ्यांना व शिक्षकाला मिळत नाही. आजच्या शिक्षकांना तरी जनरल ज्ञान देता आले पाहिजे व विद्यार्थ्यांनी ते उत्कृष्टपणे ग्रहण केले पाहिजे.पण तसे न करता विद्यार्थी हा स्वतःच्या बुद्धीचा वापर करत नाही. त्याची खरी गुणवत्ता कळू शकत नाही. त्याला जेवढे आपल्या गुरूकडून मिळते तेवढे सर्व आपल्या जवळ ठेवतो. आता तो काहीच वाढवण्याचा प्रयत्न करत नाही त्यामुळे त्याच्या बुद्धीला चालना मिळत नाही.

ज्याचे पाठांतर उत्तम तो अत्यंत हुशार असा समज झाला आहे. दिवसेंदिवस महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची संख्या वाढत आहे परंतु त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा दर्जा वेगाने घसरत आहे त्यामुळे देशाचे नुकसान होत आहे.आजच्या शिक्षणात औद्योगिकरणाच्यापरिस्थिती व्यावसायिक आणि प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण याची निकडीची गरज आहे परंतु ती गरज पूर्ण होत नाही. त्यामुळे व्यक्तीविकास हा उद्देश डोळ्यासमोर ठेवल्यास नृत्य, गायन, शिल्पकला इत्यादी कला विभागांचाही शिक्षणाचा भाग असला पाहिजे. पण दुर्दैवाने या विषयांकडे बघितले जात नाही . जणू काही एक आपल्या आयुष्यात हे एक जरुरीचे साधन नाहीच. या उद्देशाने या विषयाकडे नजर टाकली जाते.भाकरी मिळवून देणारे सुसंस्कार घडवणारे देशबांधवांना विषयी अभिमान निर्माण करणारे असे शिक्षण असावे. शारीरिक बौद्धिक भावनिक तसेच सर्व विकास साधण्यासाठी ते सर्व दृष्टीने संपन्न होईल असे आजच्या युगात शिक्षण असायला हवे. सुशिक्षितांमध्ये घरी येणारी वधु ही उपभोग्य वस्तू मानली जाते . फक्त एक हुंडा घेऊन येणारी व्यक्ती समजली जाते. कुठलाही मानव बघा निस्वार्थी होण्यासाठी त्याने पूर्वीचे ऋषीमुनींच्या आचरणातून शिक्षण घ्यायला हवे.

महात्मा गांधींच्या मते "शिक्षण म्हणजे व्यक्तींमधील अध्यात्मिक बौद्धिक अंगाचा विकास करणे ".आजची शिक्षण पद्धती ही बौद्धिक विकास करते. शिक्षण हे सर्वांगीण विकास करणारे असते मोठ्या प्रमाणावर डॉक्टर , इंजिनीअर्स, शिक्षक तयार होतात परंतु खेळाकडे दुर्लक्ष झाले आहे. यामुळेच आपल्या भारताला ऑलिंपिकमध्ये फारसे सुवर्णपदक मिळत नाही . याला कारण शिक्षण पद्धतीतील खेळाला असलेले निम्न स्थान होय. निरोगी शरीराचा विकास करणारी शिक्षण पद्धती असावी. यात खेळालाही महत्त्वाचे स्थान असावे.आज शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला विचारले तू हे शिक्षण का घेत आहेस ? त्याचे उत्तर ज्ञान प्राप्ती करणे किंवा व्यवसाय करायचा आहे असे कधीही होत नाहीत. केवळ नोकरी मिळवण्यासाठी शिक्षण घेत आहोत असेच होते . शिक्षण पद्धतीतील व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था तसे कमीच आहेत. प्रत्येकाला कमी श्रमात अधिक पैसा देणारी नोकरी हवी आहे. शिक्षणात उद्योग धंदा व व्यवसाय शिक्षण द्यायला हवे अशी आपली शिक्षण पद्धती हवी.विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणारे नैतिक मूल्य रुजणारी व सामाजिक बांधिलकी निर्माण करणारी पद्धती शिक्षण पद्धती असावी.मानसिक गुणाचे संवर्धन आणि दोषांचे उच्चाटन जे करते ते शिक्षण. जगात वावरण्यासाठी, स्वतःचा सर्वांगिण विकास करून घेण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान म्हणजेच शिक्षण. पूर्वीच्याकाळी प्रत्येक वर्णासाठी भिन्न स्वरूपाचे शिक्षण होते. ब्राम्हणवर्ग वेदविद्येचे, क्षत्रिय शस्त्रविद्येचे, आणि वैश्य व शुद्र हे आपापल्या वाडवडीलां कडून चालत आलेल्या कलेचे शिक्षण घेत असत. पण आज ही चातुर्वर्ण्य पद्धती नाहीशी झाली. त्यामुळे शिक्षण पद्धती बदललेली आहे.

बहुसंख्य सुशिक्षितांमध्ये घरी येणारी नववधू ही केवळ एक उपभोग्य वस्तू, माहेराहून खूप मोठा हुंडा घेवून येणारी व्यक्ती असेच समजले जाते. कोणताही मोठा त्याग करण्याची वेळ आली तर अडाणी, अशिक्षित माणूस मागचा- पुढचा विचार न करता कर्तव्य भावनेने त्याग करतो. उलट अश्या प्रत्येक गोष्टीचे स्वार्थासाठी भांडवल करण्याची वृत्ती सुशिक्षितात आढळते.

गुन्हेगारीचे प्रकार व प्रमाण सुशिक्षितांतच अधिक आढळतात. आजच्या शिक्षणपद्धतीची ही शोकांतिका आहे.

सजीवांमध्ये शिकण्याची प्रक्रिया ही अंगभूतच असते. अमीबासारख्या एकपेशीय प्राण्यामध्येसुद्धा ती आढळून येते. विषाणू आणि जीवाणू हे प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी स्वतःमध्ये बदल घडवून आणतात, हासुद्धा शिकण्याच एक प्रकार आहे. अधिक विकसित प्राण्यांमध्ये ही प्रक्रिया अधिक व्यापक आणि गुंतागुंतीची असल्याचे दिसून येते. मानव हा बौद्धिकदृष्ट्या अधिक विकसित असलेला प्राणी आहे. मानवी मेंदू हा सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन अगदी प्राथमिक अवस्थेत असल्यापासून सुरू करतो.

मानव जन्मानंतर निसर्गाशी संपर्क आल्यानंतर त्याला जे अनुभव येतात त्या अनुभवांचे संकलन आणि त्यातून निघालेल्या निष्कर्षांचे जतन करीत असतो. अनुभवातून शिक्षण घेत असताना त्याला ज्ञानेंद्रियांची मदत होत असते. अनुभवाला शिक्षणाची जोड दिली तर त्याच्या आकलनाची व्यापकता वाढते. पारंपरिक पद्धतीचे शिक्षण न घेतलेल्या आणि पारंपरिक पद्धतीने शिक्षण घेतलेल्या व्यक्तीमध्ये एक महत्त्वाचा फरक असतो. तो



म्हणजे शिक्षित व्यक्तीला आपल्या क्षमतांचा उपयोग चांगल्या प्रकारे कसा करून घ्यावा याची जाण असते. शिवाय योग्य प्रकारे शिक्षण घेण्याची क्षमताही त्याला प्राप्त होते.

पारंपरिक शिक्षण पद्धतीमध्ये अर्थातच शिकविणाऱ्याची गरज असते. ही गरज शिक्षकांकडून भागविली जाणे अपेक्षित असते. शिकणाऱ्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, त्याचप्रमाणे एखाद्या विषयात पारंगत होण्यासाठी चांगल्या शिक्षकाची गरज असते. निसर्ग, पुस्तक, अनुभव यांनाही गुरू मानले गेले आहे. प्राण्यांच्या वर्तनाचे निरीक्षण करूनही अनेक गोष्टी शिकता येतात. परंतु या प्रकारचे शिक्षण हे अनेक दृष्ट्या अपूर्ण असण्याचा धोका असतो. याचे मुख्य कारण एखादी गोष्ट आत्मसात करण्यात निरीक्षणाची साठवण, त्याचे विश्लेषण, विश्लेषणातून निघणारे निष्कर्ष आणि त्या निष्कर्षातून निघणाऱ्या संकल्पनांची निर्मिती या घटकांचा समावेश होतो.निष्कर्ष, विश्लेषण आणि संकल्पनानिर्मिती यासाठी योग्य त्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्यामुळेच शिक्षक अथवा गुरू यांचे स्थान औपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये अधोरेखित होते. मानवी संस्कृतीचा विकास होत असताना ज्या संस्था उदयास आल्या त्यांमध्ये शिक्षणसंस्था ही महत्त्वाची मानली जाते. या संस्थेचा उदय प्राचीन काळामध्ये झाला असला तरी त्याची व्याप्ती खूपच सीमित होती. कारण शिक्षण हे काही लोकांपर्यंतच सीमित होते. मुख्यतः राजपुत्र आणि काही धनिक व्यक्ती यांनाच सुनियोजित पद्धतीने शिक्षण घेणे शक्य होते. इतर कला कौशल्ये वंशपरंपरागत पद्धतीने शिकविली जात.

इ.स.पूर्वी आणि त्यानंतर अनेक थोर विभूती होऊन गेल्या. त्यांनी आपल्या विचारांमधून समाजामध्ये प्रचंड परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या विचारांची परिणती मुख्यतः धर्मसंस्था स्थापन होण्यामध्ये झाली. या विभूतींमध्ये गौतम बुद्ध, आद्य शंकराचार्य, महावीर वर्धमान, येशू-ख्रिस्त, महम्मद पैगंबर या व्यक्तींचा समावेश होतो, हे एका अर्थाने समाजशिक्षकच होते. त्यांच्या ठायी असणारे सखोल ज्ञान, वैचारिक बैठक, समाजापर्यंत जाण्याची क्षमता आणि विचारांतून परिवर्तन घडवून आणण्याची ताकद असल्यामुळे कुठल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नसताना व प्रतिकूल परिस्थिती असताना त्यांनी आपल्या विचारांची छाप समाजावर प्रस्थापित केली. त्यानंतरच्या काळातही शिक्षण हे बहुजनांपर्यंत काही प्रमाणात पोहोचले असले तरी त्याची व्याप्ती खूपच मर्यादित होती. त्या काळात होऊन गेलेले अनेक शास्त्रज्ञ, संत आणि इतर विचारप्रवर्तन करणारे लोक यांनी शिक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. पारंपरिक शिक्षण पद्धतीचा उदय हा गेल्या 300 ते 400 वर्षांत अधिक प्रमाणात झालेला दिसून येतो. इंग्लंडसारख्या प्रगत देशामध्ये 400 वर्षांपूर्वी विद्यापीठाची स्थापना झालेली नव्हती. त्यामुळे आज आपण ज्या शिक्षकांचा विचार करू इच्छितो ते शिक्षक ही अगदी अलीकडच्या काळाची देणं आहे.

महाराष्ट्रासारख्या शिक्षणप्रगत असणाऱ्या राज्यात मुलींसाठी 30 टक्के वेगळे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे का? यांसारख्या बाबींचाही विचार व्हायला हवा. शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यासाठी नवीन महाविद्यालये आणि विद्यापीठांची गरज भासणार आहे. परंतु ही महाविद्यालये कोणत्या भागात आहेत याचा विचार व्हायला हवा, अन्यथा शहरात महाविद्यालयांची संख्या खूपच प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. वाणिज्य आणि कला या विद्याशाखांचे शिक्षण हे अधिक व्यवसायाभिमुख होणे तितकेच गरजेचे आहे. विज्ञान विषयामध्ये व्यवसायाभिमुखतेचा समावेश असला तरी विज्ञानशिक्षणाच्या गुणवत्तेविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत. एकूणच उच्च शिक्षणाची गुणवत्ता हा एक कळीचा मुद्दा आहे. अभियांत्रिकी शाखांकडे विद्यार्थ्यांचा ओढा दिसून येतो. अभियांत्रिकी पदवीमुळे रोजगारांची उपलब्धता सहजपणे होते असा एक सर्वसाधारण समज आहे. परंतु अभियांत्रिकीची पदवी घेतलेले केवळ 25 टक्केच विद्यार्थी रोजगार मिळविण्यासाठी सक्षम असतात ही वस्तुस्थिती आहे.

उच्च शिक्षणामध्ये गुणवत्तावाढीसाठी आणि शिक्षणपद्धतीत लवचिकता आणण्यासाठी श्रेयांक पद्धत आपणे जरुरीचे आहे. दिवसेंदिवस शासन उच्च शिक्षणाची जबाबदारी झटकू पाहत आहे. त्यामुळेच अभिमत आणि खाजगी विद्यापीठांना परवानगी देण्याचा शासनाचा कल दिसून येतो. या विद्यापीठांच्या गुणवत्तेबद्दल साशंकता आहेच, त्याचबरोबर अशा विद्यापीठांधून शिक्षण घेणे हे दिवसेंदिवस सामान्य माणसाला शक्य होणारे नाही. त्यामुळे शिक्षणाची उपलब्धता वाढली तरी समाज मात्र उच्च शिक्षणापासून वंचित राहणार की काय अशी शंका उपस्थित करण्यास भरपूर वाव आहे. एकूणच भारतातील उच्च शिक्षण हे एका संक्रमण अवस्थेतून जात आहे. या संक्रमणाची परिणती समाजासाठी लाभदायक अशा स्थितीमध्ये व्हावी यासाठी समाज आणि शिक्षक यांनी जागरूक राहणे आवश्यक आहे.

# पवित्र दानाचा धर्म



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

पितृपाठाशी निगडित असलेली दानशूर करण्याची गोष्ट आपल्या सगळ्यांनाच माहीत असेल हा कर्ण मृत्यूनंतर जेव्हा स्वर्गात जातो तेव्हा देव त्याला सोन्याचं अन्न देतात भुकेला कर्ण ते पाहून अस्वस्थ होतो आणि देवाला विचारतो, " मी पृथ्वीतलावर असताना आयुष्यभर दानधर्म केला, पण माझ्या वाटेला हे सोन्याचा अन्न का? तेव्हा देवकरणाला म्हणाला, "अरे कर्णा तू आयुष्यभर जी दान धर्म केला तो सोन्या-मोत्याचा रत्नखचित दागिन्यांचा ना... म्हणून तुझ्या वाटेला हे सोन्याच अन्न !" कर्णाला त्याची चूक कळली. खास अन्नधान्य अन्न पाण्याचा दान करण्यासाठी तो सोळा दिवस पृथ्वीतलावर आला आणि हा दान धर्म करून मुक्त झाला.

या कथेचा आजच्या काळाशी संबंध आहे आणि या काळात प्रत्येक माणसाशी आहे. असं मला वाटतं ! प्रत्येक माणूस आपल्या आयुष्यामध्ये कोणता ना कोणता दानधर्म करत असतो; परंतु तो कोणत्या प्रकारचा आहे हे फार महत्त्वाचं असतं आज आपण शिक्षण आणि ज्ञानाने उभारलेलो आहोत कुठलीही गोष्ट श्रद्धेनं परंपरेने रूढी रीतीने आपण जरूर करतो, पण आजच्या काळाशी आपल्या जगण्यांशी त्याचा काही संबंध आहे का नाही हे आवर्जून आपण पाहत नाही आपल्या जगण्याचा भौतिक सुखाशी आणि हीच सुख उपभोगू पाहणाऱ्या साधनांची सर्वांनी गर्दी केली आहे सतत काही ना काही मिळवायचा आणि सतत काही ना काही घ्यायचा चांगलं राहण्याचा ध्यास माणसाला जडलेला आहे. घर, घरातलं फर्निचर, घालायला चांगले कपडे ,फिरायला टू व्हीलर, फोर व्हीलर, हातात चांगली मोबाईल, टॅब कोणत्याही मध्यमवर्गीय माणसाच्या स्वप्नातली ही सुख त्यामुळे आयुष्यभर हेच मिळवणं हे सर्वर्थाने माणसाला वाटू लागलं. यासाठी झटणं त्यासाठी कष्ट करणं जी चूक दानशूर करण्याकडून झालेली तीच आपल्या हातून होऊ शकते. आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीचे तशी आहे का? काळ बदलला तशा गरजाही बदलल्या. पण अन्नपाण्याची मूळ आणि प्राथमिक गरज मात्र जशी आहे तशी सदा सर्वदा काळ तशीच राहणार ही मूलभूत गरज भागवू न शकणारी अनेक माणसं आपल्या आजूबाजूला आहेत मग आपण त्यांच्यासाठी काही धडपड करतो का ? आपली सर्वांगाने सुखी होणं किंवा भौतिक सुख मिळवण्यामध्ये माणूस इतका हरकून गेलेला आहे की आजूबाजूला असणाऱ्या लोकांचं भान त्याला राहिलं नाही. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या माणसांना या दोन वेळेचे जेवणाचं जर अन्नदान केलं तर आपल्या हातून नक्कीच मोठे दान घडेल म्हणजे कर्णाने केलेली चूक आपल्या हातून घडणार नाही. अशी अनेक मुलं आहेत जी हुशार आणि कल्पक असूनही केवळ परिस्थितीमुळे मागे राहिले आहे. अशा माणसांना नी अशा मुलांना आपल्या ऐपती प्रमाणे जमल तशी मदत करणे कोणालाही सहज जमवू शकत. एखाद्याला ज्ञानाची गरज असेल तर त्याला ज्ञानदान देणं एखाद्याला अन्नाची गरज असेल तर त्याला अन्नदान करणे या प्राथमिक गरजा जरी आपण देऊ शकलो तरी आपण सर्वांनी योग्य दान केल्याचा समाधान माणसाला सदासर्वदा राहील.

घरातल्या वयोवृद्ध माणसांना आनंदी ठेवून त्यांच्या बारीक सारीक गरजांकडे लक्ष देणं आणि त्यांना समाधानी ठेवून अख्या घरादाराचा गोकुळ करण्याचा आनंद हा कशात मोजता येण्याजोगा नाही; मात्र आजच्या काळामध्ये या छोट्या छोट्या गोष्टीच हरवून बसलेला माणूस आता भौतिक सुखाकडे वळत आहे. या काळात आपल्या पूर्वजांचे स्मरण करणे म्हणजे त्यांच्या फोटोला फक्त हार फुल वाहणं, पूजा करणं, त्यांना नैवेद्य दाखवणं इत्यादी करणे. नव्हे त्यांच्या चांगल्या गुणांचा क्षमतांचा स्मरण करणं त्यांनी जपलेल्या परंपरा मुद्दाम जपणं आणि त्या गोष्टींसाठी त्यांचा मुद्दाम मनःपूर्वक आभार मानणे त्यांचे संवर्धन करणे म्हणजेच हे पूर्वजांचे स्मरण करणारच आहे. आपण नेहमी जुन्या माणसाची आठवण काढत त्यात रमतो. पूर्वजांच्या काळातलं ठुमदार गाव त्यांच्या गावात खळखळून वाहणारी नदी तेथे घालवलेले दिवस हिरवी हिरवेगार डोंगर असा आवर्जून उल्लेख करत असतो; परंतु आत्ताच्या काळामध्ये तीच गाव ओसाड पडले आहेत. तिथून वाहणारी निळसर नदी आता सुकलेली दिसत आहे. आजूबाजूचे गाव ओसाड पडलेले दिसत आहेत. डोंगर बोडके झालेले दिसत आहे. आणि या सर्वांमध्ये पूर्वजांचा स्मरण करणे हे खरोखर योग्य आहे का? पूर्वजांनी राखून ठेवलेला ऐवज आपण जसेच्या तसे जपणं म्हणजेच हे खरं पितृपक्षांमध्ये त्यांचा स्मरण करण्यासारख आहे. त्यांनी दिलेली परंपरा संस्कृती यांची जपवणूक आणि ठेवन आपल्या हातात हातातून योग्य पद्धतीने झाली तर त्या खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली वाहण्यासारखा आहे ना आणि सहकार्य जतन संवर्धन ही आपल्या आणि इतरांच्या आयुष्याला तारणारी महत्त्वाची मूल्य आहेत ती विकत घेता येण्याजोगी नाही ती स्वतःमध्ये आवर्जून आपल्याला रुजवावे लागतात. जी त्यांनी रुजवली ते आपण आपल्या पुढच्या पिढींमध्ये रुजवणे फार आवश्यक आहे या पितृपंधरवाड्याच्या निमित्ताने अशी काही मुल्य आहेत जे आपण आपल्यामध्ये रुजवणे फार गरजेचे आहे पितृपंधरवाड्यामध्ये पूर्वजांना जेवू घातले जाते. त्यांच्या आवडीनिवडी पाहिल्या जातात; मात्र याचबरोबर त्यांनी शिकवलेल्या संस्कारांचं काय? किमान त्यांच्या आयुष्यामध्ये त्यांनी केलेले दानधर्म किंवा त्यांनी केलेले सत्कारम आपण पुढे करत आहोत का? ह्या गोष्टी सुद्धा महत्त्वाच्या ठरतात. आपल्या हातूनही याच काळामध्ये योग्य ते दान धर्म होणं फार गरजेचे आहे. फक्त पितरांना जीव घालणार त्यांची आठवण काढणं त्यांची पूजा करणे या सगळ्या गोष्टी इतपतच संपत नाहीत तर यापुढेही याच कालखंडामध्ये आपण गरजूंना मदत करणं विचारांचा संवर्धन करणे या गोष्टी फार महत्त्वाच्या ठरतात. आवडीनिवडी सहज जोपासल्या जातात; मात्र शिकवलेल्या मूल्यांचं काय गौरी गणपतीची रेलचेल श्रावणातला सण उत्सव नुकताच संपला, आता या पंधरा दिवसानंतर सुरू होणारा नवरात्री उत्सव पुन्हा एकदा आनंद, ऊर्जा यामध्ये आपण सगळे हरकून जाणार; मात्र या दोन्ही कालखंडामध्ये श्रावणाच्या गौरी उत्सव आणि नवरात्रीच्या मध्ये येणारा हा पंधरा दिवसाचा पितृपंधरवडा या कालखंडामध्ये आपल्या हातून खरंच काहीतरी चांगल्या गोष्टी घडणं फार आवश्यक आहे, म्हणून जमेल तितकं आपण दानधर्म करणं फार आवश्यक आहे. या काळामध्ये केलेलं दानधर्म हे आपल्याला आपल्या मृत्यूपरांत सुद्धा उपयुक्त ठरेल. काळ बदलतो माणसं बदलतात मात्र काही गोष्टी अगदी जशाच्या तशाच राहतात. त्यामध्ये बदल घडत नाही सध्या न केल्या जाणाऱ्या गोष्टी माणसाचा अंतर्मन सुखावून जात असतात. आता पेरलेलं हे उद्या उगवतं असं म्हणतात, म्हणून चांगलं पेरलं तर नक्कीच चांगलं उगवेल लोक मॉर्डन झाले आधुनिक विचारांची झाले. म्हणून कदाचित या जुन्या संस्कृतींना परंपरांना मान्यता देत नाहीत. बहुतांशी हा विचार असतो की सारे करतात म्हणून आपणही त्याच गोष्टी करून टाकू मात्र त्यामागचं विचारांचं काय काहीजण मोठमोठी दानधर्म करतात त्यातून त्यांना असं वाटतं की या परंपरा या संस्कृती यांची जोपासना नाही झाली तरी पण आपल्या हातून ही मोठे दान घडलेला आहे. याचा समाधान कदाचित त्यांच्या मनाला राहत असेल; परंतु ज्या छोट्या छोट्या गोष्टीतून मिळणारे जे सुख असतं खरंतर त्यातून मिळणार समाधान आणि त्यातून कुणाची भागवलेली गरज ही फार महत्त्वाचे असते म्हणूनच या पितृपंधरवाड्यामधून मध्ये आपल्या हातून अन्नदान घडावं, ज्ञानदान घडावं भुकेलेल्या भुकेलेल्या जीवाला दोन घास देण्या इतकं मोठं दान कदाचित कोणत्या नसू शकेल, म्हणूनच अन्नदान हे सर्व सर्वदानापेक्षा श्रेष्ठ दान आहे आपण या पंधरवड्यामध्ये आपल्या पित्रांना जेवू घालणार आहोत. त्यांना संतुष्ट करणार आहोतच पण त्याचबरोबर या समाजाच्या कानाकोपऱ्यामध्ये असणारे हे भुकेले जीव त्यांच्यासाठी आपण काही करू शकलो तर हे नक्कीच समाधानाचं आणि श्रेष्ठ दान असू शकतं..!

# औरंगाबाद अन् औद्योगिक वसाहतींचे जुळलेले समीकरण



भारत सोनवणे
मोबा. 9307918393

आधुनिक केसरी

**औरंगाबाद शहर अन् औद्योगिक वसाहतीबद्दल यापूर्वी मी अनेक लेख लिहले,जे औरंगाबाद शहर सोबतीने त्याचा इतिहास अन् साधारण पाच दशकांपूर्वी काळानुरूप ऑटोमोबाईल क्षेत्रात औरंगाबाद शहराने धरलेलं बाळसं आता याच क्षेत्रात संपूर्ण जगतात ऑटोमोबाईल क्षेत्रातील आशिया खंडातील एक महत्त्वाचं शहर म्हणून झालेली शहराची ओळख हा औरंगाबाद शहराचा चढता आलेख मी माझ्या लेखणीतून नेहमीच आपल्या समोर लिखित स्वरूपात उपलब्ध करून देत आलो आहे. एकीकडे औरंगाबादमध्ये उज्वल भविष्याचा विचार करून,नव्याने डीएमआयसी अंतर्गत निर्माण होणारे नवीन अनेक प्रकल्प,अलिकडेच काही वर्षांपूर्वी पूर्णत्वास आलेली ऑरिक औद्योगिक वसाहत आणि शहराला जोडुन असलेल्या चिकलठाणा एमआयडीसी,शेंद्रा एमआयडीसी,वाळूज एमआयडीसी,चितेगाव परिसरात असलेली जुनी एमआयडीसी,बिडकीन औद्योगिक वसाहत यांच्या माध्यमातून औरंगाबाद शहराला "ऑटोमोबाईल इंडस्ट्रीयल हब" ही मिळालेली नवी ओळख आहे...**

औरंगाबाद शहरात उपलब्ध झालेला रोजगार आणि एकीकडे कोरोनोत्तर काळात उद्योग विश्वात झालेला बदल,नवीन रुजु झालेल्या संकल्पना अन् पुन्हा एकदा आता औरंगाबाद शहराजवळील औद्योगिक वसाहती नव्यानं येणाऱ्या कंपन्यांचा चढता आलेख,कोरोनाच्या वाईट काळातील दिवसांना अनुभवत पुन्हा पुर्ववत औद्योगिक वसाहतींमध्ये चालु झालेला कारभार या सर्व गोष्टी औरंगाबाद शहर हे आशिया खंडातच नव्हे तर जगतात औद्योगिक क्षेत्रात किती उंचीवरील अन् महत्त्वपूर्ण शहर आहे हे दाखवून देत आहे...

औरंगाबाद हे ऐतिहासिक आणि औद्योगिक शहर म्हणून जगाच्या नकाशावर आधीपासून ओळखले जातेच,त्यामध्ये "दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉरम" मुळे त्यात ऑरिकची नव्याने भर पडली आहे.त्यामुळेच येथे उद्योग वाढीला एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झालेले आहे, चालना मिळाली आहे अन् सोबतच अनेक नवीन कंपन्या,ग्रहनिर्माण प्रकल्प या ठिकाणी उभारल्या जात आहे जाणार आहे.

इंडस्ट्रीयल कॉरिडॉरम आल्याने औरंगाबादचा औद्योगिक विकासाचा आलेख हा पुढील पंधरा वर्षात कायम वाढत राहणारा असेल.ऑरिकमध्ये येत्या काळात ३,३०,००० लोकांना रोजगार उपलब्ध होवू शकतो असा अंदाज प्राथमिक माहितीनुसार देता येतो,या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम म्हणजे औद्योगिक उत्पादनाच्या बाबतीत शहर मोठी झेप घेऊ बघत आहे..!

नवीन निर्माण होणारा रोजगार लक्षात घेता आगामी काळात येथे मोठ्या प्रमाणावर रहिवासी प्रकल्पाची गरज भासणार आहे.अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेले रहिवासी प्रकल्प 'रिअल इस्टेट'च्या जगतात सुगीचे दिवस घेऊन येऊ बघत आहे.एकुण शहराचा विकास औद्योगिक क्षेत्राच्या आधारावर भरभराटीस येऊ बघत आहे..!

सोबतच काही अंशी का होईना परंतु आता नव्याने काही नवीन प्रकल्प उभे राहण्यासाठी स्थानिक उद्योजक असो किंवा परदेशी उद्योग विश्वातून उद्योजक भारत देशात आपले प्रकल्प या ठिकाणी स्थायिक करण्याचा प्रयत्न करत आहे.औरंगाबाद शहरात आपले पावलं रोवू बघत आहे.दिवसेंदिवस आधुनिक टेक्नॉलॉजीमुळे होणारे बदल स्वीकारत शहरात एमआयडीसी मधील प्रकल्पा अंतर्गत औद्योगिकविश्वात होणाऱ्या घडामोडी हे सर्व बघण्यासारखे आहे आणि ही बाब लक्षात घेण्या जोगची आहे..!

एकीकडे शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात ऑटोमोबाईल इंडस्ट्रीयल क्षेत्रात आपले मुळं रूजवून आहे तर सोबतच,फार्मा क्षेत्रात चालू असलेल्या घडामोडी बघता फार्मा क्षेत्रातील औरंगाबाद शहरालगत औद्योगिक वसाहतीत असलेल्या कंपन्या बघता ऑटोमोबाईल क्षेत्रानंतर सर्वाधिक कंपन्या असलेलं फार्मा हे क्षेत्र ठरत आहे..! आजमितीला या कंपन्यांच्या माध्यमातुन खूप मोठ्या प्रमाणात रोजगार हा औरंगाबाद शहर अन् जवळपास असलेल्या छोट्या शहरातील नागरिकांना उपलब्ध झालेला आहे. औरंगाबाद शहरालगत असलेल्या औद्योगिक वसाहतीत अनेक जगप्रसिद्ध नामांकित फार्मा कंपन्यांनी आपलं प्रोडक्शन हाऊस उभारले आहे.ज्या माध्यमातून सर्व विश्वात मेडीसिन पुरवण्याचे कार्य या कंपन्या करत आहेत.कोरोना ज्यावेळी मोठ्या प्रमाणात जगभरात पसरलेला होता,त्यावेळी रात्रंदिवस या कंपन्यानी आपले प्रोडक्शन हाऊस चालू ठेवून आपली कामगिरी पूर्ण केली आहे अन् खूप मदत प्रशासनाला केली आहे..!

औरंगाबाद शहरालगत असलेल्या पाच औद्योगिक वसाहतीत आज घडीला अनेक देश,विदेशी फार्मा कंपन्यांनी आपले पाय रोवले आहे.यातील काही कंपन्यानी जवळ जवळ दोन ते तीन दशकांपूर्वी येथील औद्योगिक वसाहतीत आपले प्रोडक्शन हाऊस चालू केले आहे..! यात खालील फार्मा कंपन्या मोठ्या प्रमाणात रोजगार उपलबध करून देत आहेत..!

1) Wockhardt Pharma,Wockhardt Research Center.
2) Lupin Limited.
3) Maylan Laboratories.
4) Glenmark Pharma.
5) Harman Finochem Limited.
6) Ajanta Pharma.
7) Sun Pharma Limited.
8) ATRA Pharmaceutical Company.
9) Midas Care Pharmaceutical.

अश्या अन् अनेक छोट्या,मोठ्या विविध कंपन्या या ठिकाणी कार्यरत आहेत...



औरंगाबादसह मराठवाड्यासाठी भूषण असलेल्या दिल्ली मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉरमच्या (डीएमआयसी) औरंगाबाद इंडस्ट्रिअल सिटी (ऑरिक) शेंद्रा टप्प्यात साधारण जानेवारी २०२१ मध्ये आणखी पाच नवीन कंपन्यांची भर पडली आहे. या कंपन्यांना भूखंडांचे वितरण नुकतेच करण्यात आली.या कंपन्यांमधून १६० कोटींची गुंतवणूक झाली असून जवळजवळ २५० जणांना रोजगार मिळणार आहे.

दरम्यान,Covid-19 परिस्थितीनंतर प्रथमच 'ऑरिक' व्यवस्थापनाकडे मागणी केलेल्या उद्योगांपैकी पाच उद्योगांना प्लॉट हस्तांतरित करण्यात आले.यामध्ये "Sindhiya Pharma",यासह औषधनिर्मितीतील आणखी एक कंपनी,लिक्विड ऑक्सिजनसह ऑक्सिजन प्रॉडक्टस् तयार करणारी "Inox Air Products Private Limited",फूड प्रोसेसिंगमधील एक आणि सॅनिटरी नॅपकिन बनविणाऱ्या एका उद्योग समूहाचा यात समावेश आहे..!

त्यामुळे फार्मा विश्वातसुद्धा औरंगाबाद शहर आपले स्थान निर्माण करत आहे..! त्यानंतर २०२२ मध्येसुद्धा काही दिवसांपूर्वी दिल्ली- मुंबई औद्योगिक पट्ट्यातील बिडकीन येथील औद्योगिक वसाहतीमध्ये दोन कंपन्यांनी १५२० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून त्यांना ३११ एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. "Cosmofilm" व "Piramal Pharma Private Limited." असे या दोन कंपन्यांची नावे असून या दोन्ही कंपन्या सुरू झाल्यानंतर २ हजार ७०० जणांची प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल असा औद्योगिक विभागातील अधिकाऱ्यांचा अंदाज आहे..!

औरंगाबाद इंडस्ट्रीयल सिटीमध्ये (ऑरिक) शेंद्रा येथील ३३३ भूखंड उद्योगांना देण्यात आले असून येथून उत्पादनही सुरू झाले आहे. मात्र,बिडकीन येथील क्षेत्रात अद्याप गुंतवणूक झाली नव्हती.दोन कंपन्यांनी आता गुंतवणूक केली आहे."कॉस्मोफिल्म"साठी १७३ एकर जमीन देण्यात आली असून ही कंपनी १०२० कोटी रुपयांची तर "पिरामल फार्मा" या कंपनीस १३८ एकर जागेत ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. कॉस्मोफिल्मचा प्रकल्प २०२४ पर्यंत सुरू होईल तर पिरामलचे उत्पादन २०२३ मध्ये सुरू होईल असे सांगितले जात आहे..!

औरंगाबाद सोबतच शेजारचे परभणी,बीड,जालना,या आसपासच्या जिल्ह्यातील बरेच तरुणांना रोजगार निर्माण झाला आहे.ऐतिहासिक औरंगाबाद शहराच्यालगत शेंद्रा-बिडकीन येथे आशिया खंडातील बऱ्यापैकी मोठा प्रोजेक्ट असलेली ऑरीक ही आधुनिक औद्योगिक वसाहत निर्मानाचे पूर्ण होवून हजारो हाताना रोजगार मिळाला आहे..!

औरंगाबाद शहरात ज्याप्रमाणात ऑटोमोबाईल,फार्मा सेक्टरशी निगडित कंपन्यांना येण्यास प्राधान्य देण्यात दिले जात आहे.त्याच,तेव्हढ्याच प्रमाणात कुठेतरी आयटी क्षेत्रात असणाऱ्या कंपन्यांना,प्रकल्पांना प्राधान्य दिलेले दिसत नाही,ही एक खंत कायम वाटते. या क्षेत्रातील कंपन्यांना जर औरंगाबाद शहरात स्थान दिले किंवा ते आणण्यासाठी प्रयत्न केले तर बराच सुशिक्षित बेरोजगार तरुण आपले कौशल्य दाखवून रोजगार मिळवू शकतो असे वाटते..!

अलीकडे आयटी क्षेत्रातही औरंगाबाद शहर हळू हळू का होईना बाळसे धरू बघत आहे अन् IT,BPO,KPO,TRANSCRIPTION या क्षेत्रात काम करणाऱ्या,काही आपल्याच देशातील व काही परदेशातील MNC (Multi National companies) औरंगाबाद शहरात नव्याने उभ्या रहात आहे..!

सोबतीने औद्योगिक वसाहतीत निर्माण झालेला कच्चा माल असो किंवा तयार झालेली पार्टस यांना दुसऱ्या राज्यात,देश विदेशात निर्यात करण्यासाठी किंवा तेथील काही गोष्टी कंपन्यांत ज्या महत्त्वाच्या आहेत त्यांना आयात करण्यासाठी दळणवळणाची साधने निर्माण झालेली आहे..!


औरंगाबाद शहराच्या जवळून जाणारा समृध्दी महामार्ग असो किंवा एन- एज-२११ त्यानंतर शहरातून अनेक पर्यायी मार्ग यामुळे हा प्रवास सहज झाला आहे,त्यानंतर आंतरराष्ट्रीय एअरपोर्टच्या माध्यमातून सुरू असलेली "कार्गो सेवा" आणि त्या माध्यमातून होणारे दळणवळण..!

औरंगाबाद शहर ऑरीक सिटीच्या माध्यमातून एकीकडे देश-जगतातील उद्योगविश्वात महत्त्वाचे शहर म्हणून नावारूपास येण्याचा प्रयत्न करत आहे.ऑरीक सिटीच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झालेली आहे,औरंगाबाद शहराच्या भूमीवर येणारे विविध मोठाले देश विदेशातील प्रकल्प यामुळे भविष्यात औरंगाबाद शहराचे नाव उद्योग विश्वात देशातीलच नव्हे तर जगातील महत्वाचे शहर म्हणून नावारूपास येणारे शहर ठरणार आहे,त्यामुळे नक्कीच पुढील काळ हा औरंगाबाद येथील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण असणार आहे..!

# ग्रामीण स्त्री जीवनाचे वास्तववादी दर्शन : 'दमकोंडी'

आधुनिक केसरी

**स्त्री जीवनाचे वास्तववादी दर्शन घडवणाऱ्या कथा ज्योती सोनवणे लिखित "दमकोंडी" या कथासंग्रहातून वाचायला मिळतात. गाव,शहर,निमशहरी गाव यांच्या क्षितिजावर घडणाऱ्या या कथा वाचकाला अस्वस्थ करतात.विचारप्रवण करतात. "दमकोंडी" या कथासंग्रहात स्त्री भावविश्वाशी,वास्तवाशी निगडीत विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या एकूण पंधरा कथा आहेत. लेखिकेचे बालपण ग्रामीण भागात गेलेले आहे. आजूबाजूला घडणाऱ्या घटना त्यांच्या कथांतून प्रतिबिंबित होताना दिसतात.**




**परीक्षण**

संदीप ढाकणे
संपर्क क्र. : 7588512467

पुस्तकाची अर्पणपत्रिका लक्ष वेधून घेते. "महिलांच्या न्यायासाठी लढणाऱ्या जगातल्या लाखो हातांना समर्पित" स्त्री सामर्थ्याची जाणीव करून देत महिला हक्कासाठी लढणाऱ्याना प्रेरक ठरतील अशा कथा यात समाविष्ट आहेत. कथेचे वैशिष्ट्य म्हणजे संवादातून कथा घडत जाते.प्रत्येक प्रसंगाचे चित्रण लेखिकेने आपल्या शब्दशैलीने जिवंत केले आहे. ग्रामीण विश्व चितारणाऱ्या या कथा आहेत. मराठवाडा बोलीभाषेचा वापर बऱ्याच कथेमध्ये आढळून येतो. स्त्रीयांचे भावविश्व,कौटुंबिक संघर्ष,रूढी-परंपरेमुळे मनाची होणारी घालमेल याचे वास्तव दर्शन या कथासंग्रहातील कथामधून जाणवते.

"डाव" या कथेमध्ये तुळसाचा डाव यशस्वी झाला खरा,पण आयुष्याच्या शेवटी. आयुष्यभर सहन करत आलेल्या हालअपेष्टा वर मात करत स्वतःच्या मुलाच्या विरोधात उभे राहून तुळसाने विद्रोह केला. मुलगा गपगार झाला. कधीही आक्रमक भूमिकेत आईला पाहिलेल नव्हतं. ही भूमिका आयुष्याच्या वळणावर योग्य त्या ठिकाणी घेतली असती. परखडपणे रोखठोक बोलण्याची हिंमत दाखवली असती तर आज चित्र वेगळे दिसले असते. असा एक अदृश्य संदेश "डाव" या कथेतून मिळतो.

"खरी ओळख" या कथेमध्ये पतिनिधनानंतर स्वतःच्या पायावर उभे राहणाऱ्या शितलला येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी घरमालकीन असलेली सविताताई आईच्या भूमिकेत भेटते. "पवळ्या" या बैलावर अतोनात प्रेम करणाऱ्या तात्याची कथा मात्र आपल्याला वडील आणि मुलांमधील नात्याचे दर्शन घडवते. आई आणि वडिलांच्या नात्यांमध्ये आईची होणारी घुसमट लेखिकेने समर्पकपणे शब्दबद्ध केली आहे.

"बापलेकाच्या वादात हौसाची मात्र तारांबळ उडत होती. हे नेहमीचं होतं. तिला सदा लहान असताना,तात्या सदाला काही बोलले तर तिला वाईट वाटे. पण तात्याला जाब विचारायची तिची ताकद नव्हती आणि आता सदा तात्याच्या मनाचा विचार करत नाही. हे पाहुन तिच्या मनाची तगमग होते पण त्यालाही खडसवण्याची तिची हिंमत नव्हती. तिचं आयुष्य असच गेलं होतं. कधी लेकासाठी तर कधी नवऱ्यासाठी जीव जाळण्यात..."

"कोंडमारा" या कथेतील विधवा सुनीताचा कोंडमारा अंतर्मुख करून जातो. " न केलेली चूक" मधील रुपा ही चूक झालेली नसताना सुद्धा नवऱ्याचा रोष सहन करत जगते. "निर्धार" या कथेतील ठकुने आयुष्यभर उराशी बाळगलेले एक स्वप्न म्हणजे पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन. विठ्ठलाच्या दर्शनाची इच्छा पूर्ण होण्याची वेळ आली आणि ठकूच्या नवऱ्याला साप चावला.

तेव्हा सखु देवाला जाब विचारते, "आण तेव पैशाचा डबा इकडं,मालकाच्या दवाखान्याला कामी येईल आन् त्या काळ्याला निरोप दी मपला त्याला म्हणावं, ठकू जनभर तुपल्या वारीला यायला तरसली पण त्वा काही ना काही अडचणी आणल्यास इथून मोऱ्ह ती तुपली पूजा करणार नाही,का तुपल्या नावाने पैसे बाजूला टाकणार नाही. तुला जर वाटलं तर बोलून घे तिला. तिथून मग बघू काय करायचं ते...."

अशा पद्धतीने देवाला जाब विचारणारी ठकु संत जनाबाई ची आठवण करून देते. आयुष्यात वाट्याला येणारी अवहेलना सहन करत,त्यातून मार्ग काढत कथेतील नायिका आशेचा किरण पाहताना दमकोंडी होत असली तरीसुद्धा धीराने संकटाशी सामना करतात. कधीतरी या दमकोंडीतून सुटण्याचा निर्धार या नायिका करतात. त्यात त्यांना कधी यश येते तर कधी अपयश. पण आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करत स्वतःचे सामर्थ्य सिद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न आपल्याला जाणवतो.

ग्रामीण बोली भाषेत बरेच शब्द आता लुप्त होत चाललेले आहेत. त्या शब्दांची भेट या कथासंग्रहात होते. ग्रामीण साहित्य विश्वाशी आणि वास्तवाशी नाळ जोडणाऱ्या या कथा वाचकाला अंतर्मुख करतात.

**पुस्तक : दमकोंडी, लेखिका : ज्योती सोनवणे, प्रकाशन : तेजश्री प्रकाशन कोल्हापूर, पृष्ठे-143.**

# आठवणी... अन् बोरं आंबट झाली



ज्ञानेश्वर गायके
मो.नं. 9403384889

आधुनिक केसरी

**माझ्या गावात हायस्कूल नसल्यामुळे मी वर्गमित्रासोबत सातवी पास झाल्यानंतर शेजारच्या पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात इयत्ता आठवीच्या वर्गात प्रवेश घेतला. पंचक्रोशीतील ते एकमेव माध्यमिक विद्यालय असल्यामुळे जवळपासच्या खेड्यातील मुलं त्या शाळेत प्रवेश घेत असत. आम्ही सर्व खेडेगावातील मुलं दुपारच्या सुट्टीत जेवण लवकर आटपून जवळच्या शेतात बोरं खाण्यासाठी जात असू.आमच्या शाळेतील क्लार्क सरांचे ते शेत असल्याने कोणीही आम्हाला अडवत नव्हते.**

कधी कधी बोरं खाण्याच्या नादात इकडं शाळेची घंटा वाजायची व तिकडे शाळा भरायची पण लक्षात येत नसे व उशीर झाल्यामुळे छडीचा प्रसाद की त्या प्रसादाने आम्ही खऱ्या अर्थाने घडलो तो मिळत असे.

कधी कधी दुपारच्या सुट्टीत बोरं खाण्याची इच्छा पूर्ण होत नसे म्हणून काही मुलं दुपारनंतर शाळेतून पळून जात व बरोबर शाळा सुटेपर्यंत बोरं खात व नंतर घरी जात असे..त्याचा फायदा असा होता की घरी आई बापाला असे वाटत असे की पोरगं शाळेतून सरळ घरी आलं.

असेच एक दिवस मला ही वाटले की आज मनसोक्त बोरं खाण्याचा आनंद घ्यायचा. शेवटी जीवनात आनंद महत्वाचा म्हणून मी गावातील वर्गमित्रासोबत दुपारच्या सुट्टीत जेवण झाल्यानंतर रस्त्याने बोरं वेचत घराकडे निघालो.त्या दिवशी सायकल नसल्याने पायी पायी पाच किलोमीटर अंतर पार करून असे ही घरी जाणे होतेच म्हणून सावकाश बोरं गोळा करणे चालू होते.


गोणपाटाची पिशवी की जिचा दप्तर म्हणून उपयोग होत असे.ती बोरांनी भरवली व भाकरीचे फडके की जे रिकामे होते त्यात ही बोरं भरवणे चालू केले.तितक्यात माझे चुलते बाहेरगावी गेले होते ते सायकल वरून घरी जातांना त्यांनी मला पाहिले व आमच्या जवळ येऊन उभे राहिले.

चुलते समोर पाहून मी गर्भगळीत झालो. मार खाण्याच्या भीतीने हात पाय लटलट कापायला लागले.आता फक्त कानफटात बसण्याचा उशीर पण काय झाले कुणास ठावूक त्यांनी मला मारले नाही व प्रेमाने आमच्याशी बोलून आम्हाला सायकलवर बसवून घरी घेऊन आले.

सुटलो बा एकदाचा.. या विचाराने मी सुटकेचा निःश्वास सोडला पण संध्याकाळी वडील रानातून घरी आले.त्यांनी मला विचारले की आज घरी केव्हा आला व शाळेत पूर्ण वेळ होता का?त्यांच्या या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडे नव्हते कारण मला हे समजले की वडिलांना आपला आजचा कारनामा माहित झाला आहे.व त्यानंतर मला फटके मारणे सुरू झाले..शाळा बुडवून बोरं खाल्ले म्हणून.. अन त्या दिवसापासून शाळेतून पळून जाऊन बोरं खाण्याची सवय सुटली ती कायमची व त्या दिवसापासून बोरं ही आंबट झाली की ती पुन्हा गोड लागलीच नाही.



# विरोधी पक्षांचा एकीचा दावा हास्यास्पद



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**अखिलेश यादव, मायावती, केसीआर, अरविंद केजरीवाल हेही स्वतःला पंतप्रधान पदासाठी लायक समजत आहेत. सध्या फक्त असुसोद्दीन औवेसी अजून म्हणाले नाहीत की "मैं हुं अगला प्रधानमंत्री हिंदूस्थान का." भारतातील सर्व विरोधीपक्ष नेते बोलतांना म्हणतात की आम्ही एकत्र येऊन भाजपला आधी हरवणार आणि नंतर निवडणूकीतील विजयाचे विश्लेषण करुन पंतप्रधान पदाच्या नेत्याचे नाव ठरवू. जे आयुष्यभर फक्त स्वार्थासाठी जगलेत, राजकारणात आलेत, आपापले पक्ष काढून लूट करण्यातच गुंतलेले आहेत. ते एक येणार हेच हास्यास्पद दावे वाटतात. हा एक मोठा विनोद वाटतो.**

भारत माझा देश आहे. काँग्रेस सोडून सारे भारतीय माझे बांधव आहेत, माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला आभिमान आहे. भारतीय राजकारणातील भाजपा सोडून इतर सर्व राजकीय पक्षांचा मला प्रचंड तिटकारा आहे. कारण ते घराणेशाही जोपासणारे आणि फक्त सार्वजनिक मालमत्तेचे अपहरण करणारे पक्ष आहेत. सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची मनोवृत्ती जोपासणारे आहेत. सरंजामशाही जोपासणारी मंडळी देशाचे वाटोळे करत आहेत.

देश चालवायची अक्कल फक्त आमच्याच घराण्याच्या सदस्यांमध्ये आहे असा ठाम विश्वास यांचा आहे. शरद पवार, सुप्रिया सुळे, अजित पवार, अभिजीत पवार, रोहीत पवार, पार्थ पवार, सुनेत्रा पवार हे सगळे नेते होण्याच्या लायकीचे असून बाकी सगळे मुर्ख आहेत असे यांचे ठाम मत आहे. या प्रकारचे एक एक घराणे प्रत्येक राज्यात आणि नेहरू, गांधी घराणे देशात कार्यरत आहेत.

नितीशकुमार यांचा या वेळेसचा निर्णय मात्र चुकीचा व आत्मघातकी ठरणार आहे. नितीशकुमार यांचे या निर्णयामुळे अपरिमित नुकसान होणार आहे.

अगदी रणनितीकार प्रशांत किशोर यांनी भावी मुख्यमंत्री होण्याच्या लालचीने नितीशकुमार यांना मदत करायची असे ठरवले तरी बिहारमध्ये येत्या 2023 च्या निवडणुकीत नितीशकुमारांचे निश्चित नुकसान होणार आहे. ममता बॅनर्जी यांचा काँग्रेसला जवळ करण्यास विरोध आहे. काँग्रेस शरद पवार यांना लॉलीपॉप दाखवत आहेत. नितीशकुमार स्वयंभू पंतप्रधान पदाचे उमेदवार जाहीर झाले आहेत. ममता दीदी म्हणत आहेत की नरेंद्र मोदींना मीच टक्कर देऊ शकते.

अखिलेश यादव, मायावती, केसीआर, अरविंद केजरीवाल हेही स्वतःला पंतप्रधान पदासाठी लायक समजत आहेत. सध्या फक्त असुसोद्दीन औवेसी अजून म्हणाले नाहीत की "मैं हुं अगला प्रधानमंत्री हिंदूस्थान का."

असे हे भारतातील सर्व विरोधीपक्ष नेते बोलतांना म्हणतात की आम्ही एकत्र येऊन भाजपला आधी हरवणार आणि नंतर निवडणूकीतील विजयाचे विश्लेषण करुन पंतप्रधान पदाच्या नेत्याचे नाव ठरवू. जे आयुष्यभर फक्त स्वार्थासाठी जगलेत, राजकारणात आलेत, आपापले पक्ष काढून लूट करण्यातच गुंतलेले आहेत. ते एक येणार हेच हास्यास्पद दावे वाटतात. हा एक मोठा विनोद वाटतो.

तरीही न चुकता दर निवडणूकीत विरोधक आवर्जून हा विनोद करतच असतात. 2023 मध्ये अनेक राज्यात विधानसभेसाठी मतदान होणार आहे. तिथेच विरोधकांची लायकी, कुवत समजणार आहे. त्या निकालावरून 2024 ची लोकसभा निवडणूक लढवण्याची स्ट्रॅटेजी ठरली जाईल.



पण गेल्या आठ नऊ वर्षात भारतीय जनता पक्षाच्या, नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने केलेले कार्य अतुलनीय असल्या कारणाने, भारतीय मतदार जागृत झाला आहे. देशप्रेम आणि स्वच्छ विकासाभिमुख कारभार, अनेक क्षेत्रात केलेले कांही अतर्क्य यशस्वी निर्णय, जगाच्या राजकारणात भारताने स्वतःचे निर्माण केलेले अढळ स्थान, देशात पक्क्या सडकांचे विणलेले जाळे, पायाभूत सुविधांमध्ये झालेली प्रगती, भ्रष्ट व उघडे पडलेले विरोधक, हे सर्व पाहता जगातला कोणताही अनभिज्ञ, अशिक्षित माणूसही सांगेल की 2024 मध्ये भारतीय जनता पक्षाच्या विजयाला कोणीही रोखू शकत नाही. इतकेच नाही तर 2019 पेक्षा तीस चाळीस जागा जास्तच जिंकेल भाजपा. त्यात जर 2024 पूर्वी एखादा सर्जिकल स्ट्राईक, पिओकेचा निर्णय, समान नागरी कायदा लागू करणे, नागरिकता कायदा कडक राबवणे आणि विरोधी पक्षातील कांही प्रमुख नेते जेलमध्ये घालणे या गोष्टी घडल्या तर 3/4 जागा (पंच्याहत्तर टक्के जागा) भाजपा जिंकेल. 80-82 राजकीय पक्ष विसर्जित होतील. त्यांची मान्यता निवडणूक आयोग रद्द करेल.

मुंबई महानगरपालिकेसह पुणे, पिंपरी चिंचवड, औरंगाबाद (संभाजीनगर), परभणी, नांदेड-वाघाळा, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, उल्हासनगर, सोलापूर, या निवडणूका भाजपने युतीचे माध्यमातून जिंकल्या तर विरोधकांमध्ये घबराट पसरेल. मग बघू विरोधकांची एकी कशाचे बळावर होणार आहे.

# चला, शांती प्रस्थापित करुया...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जगाने दोन महायुद्ध आणि अनेक शितयुद्धांत झालेला निरपराध लोकांचा नरसंहार पहिला होता. जगाला युद्ध नको, तर शांती हवी आणि त्यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न होणे अगत्याचे असून आता जगाला युद्ध परवडणारे नाही ! हे कळून चुकले होत. त्यामुळेच १९८१ साली झालेल्या राष्ट्रकुल बैठकीत २१ सप्टेंबर हा "जागतिक विश्वशांती दिन" म्हणून घोषित करण्यात आला ! तसं पाहिलं तर, सर्वकाळ शांती प्रस्थापित व्हावी यासाठी जगाच्या इतिहासात भारताचे स्थान सर्वोच आहे !**

इसविसनपूर्व पाचव्या शतकांत जन्मलेल्या राजपुत्र सिद्धार्थ गौतम बुद्धाने माणूस दुःखी का आहे (?), आपल्या राज्यातील सर्व वाद संपुष्टात यावेत आणि संपूर्ण राज्य सुख शांतीने नांदावे यासाठी सर्वसंग परित्याग करून केवळ ज्ञान प्राप्त केले आणि "जगाला केवळ शांततेची नितांत गरज आहे !" याचे प्रतिपादन केले. त्याचबरोबर इसविसनपूर्व तिसऱ्या शतकांतील महान चक्रवर्ती सम्राट अशोकाने जेंव्हा कलिंगच्या युद्धातील नरसंहार पहिला, त्यानंतर त्याने बुद्ध धम्म स्वीकारून उर्वरित आयुष्य लोककल्याणाकरिता व्यतीत करायचे ठरवले !

त्यानंतर अनेक भारतीयांनी जगात शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेलांनी दहा हजार दिवस तुरुंगात काढून शांततेच्या मार्गाने सत्ता परिवर्तन घडवून आणले ! दुसरीकडे भारतीय स्वातंत्र्याचा प्रदीर्घ लढ्यात राष्ट्रपिता महात्मा गांधींनी अहिंसा मार्गाने लढा देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले ! स्वामी विवेकानंदानी अमेरिकेच्या धर्म परिषदेत 'माझ्या बंधू आणि भगिनींनो' हे दोन शब्द उच्चारून संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे वेधून घेतले !

मित्रांनो, अजून जगावरील कोरोनाचे संकट निर्वाळले नाही ! दुसरीकडे रशिया-युक्रेन युद्धात दोन्ही देश अक्षरशः नेस्तनाबूत झाले आहेत ! तिसरीकडे सामान्य लोकांनी श्रीलंकेतील जुलमी राजसत्ता उलथून टाकली आहे ! वर्तमानातील ह्या सर्वच घटना अत्यंत बोलक्या असून, यातून जगाने आणि माणसाने सुद्धा बोध घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे ! माणसाला आनंदी जगण्यासाठी साधनांची नाही तर शांततेची नितांत आवश्यकता आहे ! जगातील अनेक देशाकडे अणुबॉम्ब सारखी महाभयंकर नरसंहारक शस्त्र असली तरी त्या शस्त्रांचा उपयोग काय ? जग जिंकल्यावर सिकंदर 'आता कुणाला जिंकू ?' म्हणून रडला आणि आत्महत्या केली ! सर्व १०१ कौरव मेल्यानंतर



'आता जागून काय उपयोग ?' असा प्रश्न करून पाचही पांडव राज्यत्याग करून निघून जातात ! म्हणजेच जगाला कधीच युद्धाची गरज नव्हती आणि नाही सुद्धा ! जगाला शांतता आणि प्रेमाची नितांत गरज आहे !

तेंव्हा चला तर मग, आज "विश्वशांती दिनाच्या" निमित्ताने आपल्या महान पूर्वजांचा वसा आणि वारसा जतन करुया ! आपले घर, परिसर, राज्य, देश आणि संपूर्ण जग कसे सुख-समाधान-आनंद-शांततेत नांदेल (?) यासाठी संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
जो जें वांच्छील तो तें लाहो । प्राणिजात ॥

या ओव्या असो कि; बृहदारण्यकोपनिषद् या प्राचीन ग्रंथातील

ॐ असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय।
मृत्योर्माऽमृतं गमय। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

या महत्वपूर्ण प्रार्थनेसह घराघरांत शांतता प्रस्थापीत होण्यासाठी मनोभावे प्रार्थना करूयात ! प्रत्येक घरी शांतीदीप प्रज्वलित होऊन जगभर शांती नांदावी यासाठी प्रार्थना करूयात ! स्वतः शांत-आनंदी रहा आणि जगाला शांतीचा, प्रेमाचा संदेश द्या ! ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः!

# जोरदार पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान

## कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक पिके जमीनदोस्त ; शेतात साचले पाणी, पिशोर परिसरात ढग फुटी

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागात मागील काहि दिवसापासून धुव्वा-धार पाउसाचे आगमन सूरु झाल्याने वरील घेतलेल्या शीर्षका प्रमाणे स्थाति झाली आहे. कन्नड़ तालुक्यातील प्रमुख व्यवसाय हा शेती आहे, शेतीच्या उत्पादनावर अनेकांचे उदरनिर्वाह अवलंबुन असल्याचे चित्र दिसत आहे, व्यापारी सोबत शेतकरी मजूर यांसगळ्याचे प्रमुख साधन म्हणजे शेती मधून निघनारे पिक, मात्र सप्टेंबर महिन्याच्या सुरवाती पासून रिमझिम पाउसाणे सलग सरी धरत त्यांचे रूपांतरण दमदार पाउसात झाल्या असल्याचे चित्र दिसत आहे,

१५ दिवसांपासून परिसरात पावसाने हजेरी लावल्याने खरीफ हंगामातील पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी चिंतातूर झाले आहेत. हंगामातील कापूस, मका, सोयाबीन, तूर, मूग, उड़ीद, भुईमूग आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे . गेल्या १५ दिवसांपासून परिसरात सर्वत्र धुव्वा धार सरी कोसळत असल्याने शेतातील कोळपणी, निंदणी व मशागतीची कामे खोळंबली असून, पाऊस कधी थाम्बनार या विवंचनेत शेतकरी पडला आहे. जवळपास १२ ते १५ दिवसांपासून सतत ढगाळ वातावरणामुळे सूर्यदर्शन दुर्लभ झाले आहे. त्यामुळे कापूस, मका सूर्यप्रकाशाअभावी पिवळी पडू लागली आहेत. दरम्यान , मूग पिकाच्या उभ्या शेंगयात आलेल्या रोगांना अनेक शेतकरयांचा हातातोंडाशी आलेला घास गेला आहे. धो - धो बरसणाऱ्या पावसामुळे शेतातील निदणीची व पिकातील आंतरमशागतीची कामे खोळंबली आहेत.

आता पाऊस कधी थांबेल या विवंचनेत शेतकरी पडला आहे . तसेच उर्वरीत येणारे सर्व नक्षत्रे ही पावसाची असून पावसाने उघडीप दिली तरच पिकांची वाढ चांगली होते म्हणून शेतकरी मकामांसाठी आता पाऊस यांवण्याची वाट पाहात आहेत.

परिसरात मोठ्या प्रमाणात लागवड केलेल्या पिकाचे पावसाच्या सततधारेमुळे पिकांचे आतोनात नुकसान दिसून येत आहे, अती पावसाने कापूस पिकाची पाने पिवळी व लालसर होऊन गळत आहे . काही शेतात पाणी साचल्याने कापसाची झाडे मर रोगामुळे सडन्याचि वेळ सध्याला आली आहे, पिके वाचविण्यासाठी महागातल्य महाग औषधांची फवारणी करूनही पिकांमध्ये सुधारण होत नसल्याने औषधांचा खर्च ही वाया जात असल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे प्रादुर्भावामुळे यंदाच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संततधारेमुळे भाजीपाला पिकांनाही फटका बसला आहे.

कन्नड तालुक्यातील पिशोर परिसरात मोठ्या प्रमाणात पाले भाज्या घेतल्या जाते लागवड केलेल्या भेडी, गवार, टमाटे, वांगी या पिकांनाही सततच्या संततधारेमुळे मोठा फटका बसत आहे. या भाजीपाल्याची वेळेत खेडणी होत नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका सहन करावा लागनार असल्याचे चित्र दिसत आहे. तसेच शेतकरी आपले पिक वाचवन्यासाठी तारे वरची कसरत करीत आहे, मात्र संबधित विभाग साखर झोपेत असल्याचे चित्र दिसत आहे शेतकऱ्याच्या बांधा वर अद्याप एक ही अधिकारी कर्मचारी आले नसल्याणे शेतकरी वर्ग संबंधित विभागच्या विरोधात रोषाची भावना व्यक्त करीत आहे.



### भिलदरी व वाड़ीभारंबा गावात मका आडवी व कापूस पाण्यात

तालुक्यातील भिलदरी, व वाड़ीभारम्बा गावात मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्याने मुळे खूप शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमानात नुकसान झाले आहे, मक्का ,कपाशी, तुरी, सोयाबीन, जमीन दोस्त झाले, आहे या आलेल्या अवधान मुळे शेतकरी वर्ग चिंतातुर झाले आहे . परिसरातील शेतकरी वर्ग पेरणी साठी व्याजाने, उदार, उसनवार, पैसे आणून बी बियाणे व आपले शेतातले पिकानची लागवड करतात मात्र सध्याच्या स्थिथित शेतातील पिके हातात येऊन तोन्डाचा घास हतातून जात असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे, नैसर्गिक आपत्ति मुळे पिके हातातून निघून गेलेले आहे, पिकावर केलेला खर्च कसा फेडावा ?? उधारी वाल्यांना काय उत्तर दयाचे असे प्रन्न निर्माण झाले आहे, शेतकरयांची दुर्दशा बघता शासनाने यांना तात्काळ पंचाने करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी गावकरींच्या वतीने होत आहे या नुकसान ग्रस्त शेतकरी चे नावे . चंपालाल अजबसिंग सिंगल गट नं .51संतोष गोठवाळ प्रेमसिग महेर, गांधी गोठवाळ, कल्याण वैष्णव, भगवान राजपूत चंदन, गोठवाळ, नंदू बम्हनावत, नंदू बोराडे ,नारायण कवाळ ,कपूर महेर , रामकिसन वैष्णव, चंदन वैष्णव, विठ्ठलदास वैष्णव, कैलास वैष्णव,प्रताप राजपूत, चंपालाल राजपूत, राजू राजपूत, शिकंदर शहा, तसेच वाडी भारम्बा येथील शेतकरी, काकासाहेब आड़े, सुनील चव्हाण, सुरेश चव्हाण,भावलाल राठोड़, संजय जाधव, सुनील जाधव, आदी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे .

### पिशोर परिसरात ढग फूटीची स्थितीय ; पुल झाले बकाल .. शेतकरी हैराण

कन्नड तालुक्यातील पिशोर परिसरात ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने नदी नाल्यांना पूर आले आहे . यामुळे या परिसरातील सात गावांचा संपर्क तुटला असून गावकऱ्यांची दळणवळण व्यवस्था बंद पडली आहे . सोबतच पिशोर येथील अंजना पळशी प्रकल्प ओव्हर फ्लो झाला आहे . रात्रीच्या सुमारास कन्नड तालुक्यातील पिशोर भागात ढगफुटी सदृश पाऊस झाला . त्यामुळे परिसरातील कोळंबी तांडा – भारंबा , भारम्बा तांडा, भारंबावाडी , माळेगाव ठोकळ, माळेगाव लोखंडी, जैतखेडा , साळेगाव, सालेगाव तांडा, यासह अनेक गावांचा संपर्क तुटला आहे . त्यामुळे शेतात गुरांना चारा पाणी करण्यासाठी व दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना जीव मुठीत धरून पाण्यातून प्रवास करावा लागत आहे . पिशोर भागात झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे नदी नाले ओसंडून वाहत आहे . तर अनेक भागात शेतात पाणी तुंबले आहे, तसेच दररोज येणाऱ्या जाणाऱ्या शेतकरयांना दोरिच्या सहरयांने जीवमुठित धरून प्रवास करावा लागत आहे, त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे . आधीच पावसामुळे पिकं पिवळी पडत असतांना आता रविवारी झालेल्या ढगफुटी सदृश पाऊसामुळे आता पिकं वाचण्याची शक्यता खूपच कमी आहे . त्यामुळे शेत यांना आता ह्या नुकसानीचा सामना करावा लागणार आहे . तर रविवारी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे . कन्नड तालुक्यात खालील प्रकारे पावसाची आता पर्यंत आगमन झाले आहे .



# हरिणाच्या धडकेत दुचाकीस्वार व हरिण ठार

## सेलू ते पाथरी रस्त्यावर कुंडी पाटीनजीक घडली घटना

आधुनिक केसरी न्यूज

**देवगावफाटा :** गुगळी धामणगाव येथील माणिक डख हे दुचाकीने सेलू येथून गावाकडे जातांना कुंडी पाटीनजीक अचानक त्यांच्या धवत्या दुचाकीला हरीण येऊन धडकले.या आपघातात हरीण व दुचाकीस्वार दोघेही ठार झाल्याची घटना मंगळवारी दुपारी ११ वा. वा.घडली.

गुगळी धामणगाव येथील माणिक भगवान डख ( वय ५२ ) हे शेती व्यावसाय करतात.ते मुलांच्या शिक्षणासाठी सेलू येथे राहतात.ते दररोज शेतीसाठी ते गुगळी धामणगाव येथे दुचाकीने ये जा करत असत .ते मंगळवारी दुचाकी क्रं.एम.एच. २२ ए.के.१३९१ ने सेलू येथून गुगळी धामणगाव कडे दुपारी ११ वा.दरम्यान जातांना कुंडी पाटी नजीक एक हरीण त्यांच्या धावत्या दुचाकीवर येऊन आदळले.या आपघातात हरिण ठार झाले.तर माणिक डख हे घटनास्थळी पडून होते.नागरीकांनी माणिक डख यांना सेलू येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले.पण डाँक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनास्थळी पोलीस निरीक्षक रावसाहेब गाडेवाड, पोउपनी अशोक जटाळ,सपोउपनी ग्यानदेव बेंबडे हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी पंचनामा केला.त्यानंतर खाजगी रूग्णालयातून माणिक डख यांचा मृतदेह शेवविच्छेदनासाठी सेलू उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला आहे. हि घटना धामणगाव येथे समजताच गावावर शोककळा पसरली.

# अतिवृष्टी अनुदानासाठी पैठणला राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसची निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या अनुदान यादीतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे इतर तालुक्याला जी मदत देण्यात आली, त्याप्रमाणे पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांनाही अनुदान देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या व काँग्रेसच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देवुन निदर्शने करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारकडून अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर करण्यात आले. या यादीत औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुका वगळण्यात आला आहे. पैठण तालुक्यामध्ये सरासरीपेक्षा जास्त टक्के पाऊस झाला आहे. त्यामुळे येथील पिकांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. येत्या दहा दिवसांत शेतकऱ्यांना आतिवृष्टी मिळाली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मोठे आंदोलन करण्यात करण्यात येईल. यावेळी माजी आमदार संजय वाघचौरे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय गोर्डे, तालुकाध्यक्ष आप्पासाहेब निर्मळ, शहराध्यक्ष जितु परदेशी, ज्ञानेश्वर कापसे,विष्णु बोडखे काँग्रेसचे कांचनकुमार चाटे, भाऊसाहेब पिसे,आप्पासाहेब गायकवाड, विजय चव्हाण, संजय सदावर्ते, किशोर दसपुते, डॉ. गुलदाद पठाण, यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.



# राक्षसवाडी येथे त्रिवेणीसंगम सत्कार सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** मौजे राक्षसवाडी येथे दि.१९/०९/२२ रोजी सेवा सहकारी सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमन संतोष सुग्रीव गडदे, व्हा. चेअरमन नागोराव गडदे व सर्व सन्माननीय संचालक मंडळ, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सुभाषराव गडदे व महाराष्ट्र सुरक्षा दल भरती मध्ये निवड झालेले चि. कांशीराम भागवत गडदे, चि. विकास धारूबा गडदे, चि. साळबा एकनाथ गडदे, चिं. हौसाराम उत्तम बिरगड, चि. पाराजी बालासाहेब कुंडगर यांच्यासह गावातील विविध स्तरातील मान्यवरांच्या सत्काराचे आयोजन जिल्हा परिषद सदस्यबालासाहेब शेप व पंचायत समिती सदस्य डॉ.व्यंकटेश चामनर सर यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी या त्रिवेणीसंगम सत्कार सोहळ्यात निरनिराळ्या स्तरातील सर्व मान्यवरांना मानाचा फेटा, शाल-श्रीफळ व पुष्पहाराने स्वागत करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या सत्कार समारंभासाठी प्रकाशराव गडदे, सतिश गडदे, क्ष्मणराव गडदे, बाबा गडदे, अंकुशराव गडदे, सुग्रीव गडदे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्काराचा स्वीकार केल्या बद्दल पंचायत समिती सदस्य डॉ.व्यंकटेश चामनर यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



# ग्रामिण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी खासगी दवाखाने थाटले

## प्रसुतीच्या रुग्णांना परभणीला पाठवण्यात येत असल्याची तक्रार




आधुनिक केसरी न्यूज

**पाथरी :** ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी सतत गैरहजर राहत असल्यामुळे प्रसुतीसाठी आलेल्या रुग्णांना व ईत्तर रुग्णांना रुग्णालयात असलेल्या परीचारीका (सिस्टरच)वैद्यकीय अधिकारी यांना फोनवर बोलुन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नावाने पत्र देवुन परभणीला पाठवत असुन रुग्णांच्या जिवितासी खेळल्या जात असल्याची व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी खाजगी दवाखाने थाटले असल्याची तक्रार वंचीत बहुजन आघाडीचे लींबाजी ढवळे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

सविस्तर वृत्त असे की,पाथरी ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी वेळेत हजर नसल्याने रुग्णालयात प्रसुतीसाठी आलेल्या रुग्णांना रुग्णालयात असलेल्या परीचारीका योग्य तपासणी न करताच तुमच्या रुग्णाला पाणी कमी आहे,रक्त कमी आहे कींवा बाळाचे ठोके कमी आहेत अशी कारणे दाखवत प्रसुतीसाठी आलेल्या रुग्णांना परीचारीकाच वैद्यकीय अधिकाऱ्यांला फोनवर बोलुन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नावाने पत्र देवुन परभणीला पाठवत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.व त्याच बरोबर ग्रामिण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.आर.एस.जाधव, डॉ.एस.एन.धबाले, डॉ.कविता घनवट यांनी खाजगी दवाखाने थाटले असल्याची तक्रार वंचित बहुजन आघाडीचे लींबाजी ढवळे यांनी उपविभागीय अधिकारी पाथरी, तहसिलदार पाथरी, गटविकास अधिकारी पाथरी याच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

प्रसुतीसाठी आलेल्या महीलांना परभणीला पाठवणे हा तर रुग्णांच्या जिविताशी खेळ ; ग्रामिण रुग्णालयातील प्रकरणी जिल्हाशल्य चिकित्सकांकडे धाव घेणार

**-लींबाजी ढवळे**

### जिल्हा शल्यचिकित्सक लक्ष देतील का ?

पाथरी ग्रामीण रुग्णालयात १० सप्टेंबर रोजी रेणापुर येथिल गरोदर महीलेला पोटात दुखत असल्याने आणले असता रुग्णालयात असलेल्या परीचारीकेने तपासून पृकृती नाजुक असल्याचे सांगत परभणीला पाठवले परंतु सदरील गरोदर महीला परभणी येथील रुग्णालयात दाखल झाली असता तीला प्रसुतीसाठी चार-पाच दीवसाचा वेळ असल्याचे सांगितले तर दुसऱ्या दीवशी अंधापुरी येथिल गरोदर महीला रुग्णालयात आली असता रुग्णालयात असलेल्या परीचारीकेने या महीलेच्या गर्भात पाणी कमी आहे .महीलेला रक्त कमी असल्याचे सांगत परभणीला पाठवले ही महीला परभणीच्या रुग्णालयात पोहचली असता तीची प्रसुती नॉर्मल झाली याचा अर्थ असा होतो की पाथरी रुग्णालयात रूग्णाच्या जीविताशी खेळले जात असुन संबंधीत प्रकरणी उपविभागीय अधिकारी पाथरी यांच्या कडे तक्रार दीली असल्याचे लींबाजी ढवळे यांनी म्हटले आहे .



# देवगिरी बँक शाखा गंगापूर येथे स्वातंत्र्य सैनिक आणि कोरोना योद्ध्यांचा गौरव सन्मान सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पुर्वसंधेला देवगिरी बँक शाखा गंगापूर येथे मुक्तिसंग्रामात सक्रिय सहभाग घेतलेले जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक कन्हैयालालजी दायमा, श्रीमती मथुराबाई रामकिसनजी पारिक तसेच कोरोना महामारी संकटात स्वतःची, कुटुंबाची चिंता न करता सतत अखंडपणे समाजातील गरीबांना व रुग्णालयातील रुग्णांना अन्न, औषधी, फळे तसेच वैद्यकीय कँम्प घेऊन रुग्णांना सेवा देणारे कोरोना योद्धे अतुल रासकर, प्रशांत मुळे, डाँ प्रशांत पंडुरे, शहर कार्यवाह डाँ.अमोल पवार यांचा शाखाधिकारी संजय डाखोरकर यांच्या हस्ते गौरव सन्मान करण्यात आला. यावेळी आर्यसमाज संघटक डॉ लक्ष्मण माने यांनी मुक्तिसंग्रामातील इतिहास अनुभव, क्रांती सुरुवातीचा शुभारंभ याचे विश्लेषण केले .आयर्वेदरत्न पुज्य विज्ञानमूनीजी यांनी रजाकारीचा प्रत्यक्ष आलेला अनुभव सांगितले. जेष्ठ विदिज्ञ अँड. चंद्रकांत पाटील देवगिरी बँकेच्या या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले. असेच कार्यक्रम ईतर संस्थांनी घेऊन मराठवाडा मुक्ती संग्राम इतिहास सर्व सामाजापर्यत पोहोचवावे तसेच तरुणांना सुध्दा यांची माहिती असावी असे ते म्हणाले.

सर्व प्रथम भारतमातेच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले. तसेच याप्रसंगी बँकेचे खातेदार रमेश दंडे यांना रु 10 .00 लक्ष चे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे मंजुरी पत्राचे वितरण करण्यात आले. शाखाधिकारी संजय डाखोरकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचलन व बँकेच्या विविध योजनांची संतोष पुदाट यांनी विशद कली. मान्यवरांचा परिचय श्रीकांत माटे यांनी केला आभार श्रीमती वर्षा मजकुरे यांनी मानले.

या प्रसंगी मा. गंगापूर तालुका संघचालक श्री किशोरजी (बापु) कुळकर्णी, मनिष वर्मा, शामलाल दायमा, रावसाहेब तोगे, सलीम पठाण, सादेक शेख,अशोक वाघ, पृथ्वीराज तोगे, सागर जंगम तसेच बँकेचे मा. सभासद खातेदार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश धनायत, महेंद्र मकासरे, दिपक वंजारे यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी व संपन्न केला.

# भाजपा कार्यकर्त्यांच्यामागे मी खंबीरपणे उभा

## सायगव्हाण येथील कार्यक्रमात डॉ. भागवत कराड यांचे आश्वासन



आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील सायगव्हाण येथे ग्रामपंचायतच्या वतीने विविध कामांचे लोकार्पण भर पावसात केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांच्या हस्ते व भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, भाजपा जिल्हा सचिव प्रा. संजय गव्हाणे, भाजपा तालुका अध्यक्ष भगवान कोल्हे, जिल्हा परिषद सदस्य किशोर आबा पवार, मा उपसभापती काकासाहेब तायडे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रदीप बोडके, शहराध्यक्ष सुरेश डोळस, माजी सभापती उत्तम राठोड, तालुका सरचिटणीस सुभाष काळे, भगवान ठाकरे, तालुका सचिव संजय चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये सायगव्हाण, बादरपुर, भिलरी, शिवतांडा, या गावातील विविध विकास कामांचे लोकार्पण केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ.कराड साहेब आपल्या भाषणात म्हणाले की अंधानेर, नागद सर्कलमधील भाजपाच्या कार्यकर्त्यांच्या पाठीमागे मी खंबीरपणे उभा आहे त्यांना जी मदत पाहिजे आहे. मी तात्काळ नेहमी करतो व करत राहणार अंधनेर, नागद सर्कलमधील विरोधक भाजपाच्या विकास कामांच्या आड येत आहे. भाजपाच्या कार्यकर्त्यांना त्रास देत आहे. हे आम्ही कदापि सहन करणार नाही.

प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा देशभरात साजरा करण्यात येत आहे. त्याचाच हा भाग म्हणून या ठिकाणी जनतेच्या सेवेमध्ये विविध विकासकाम पूर्ण केल्यानंतर त्याचे लोक आपण या ठिकाणी करण्यात आले. यावेळी नवीन ग्रामपंचायतचे उद्घाटन तसेच सिमेंट रस्ते ड्रेनेज लाईन, हाय मास, पाणीपुरवठा योजना, जलजीवन मिशन अंतर्गत सर्व कामे तात्काळ करून जनतेला सेवा देण्याचे काम सरपंच संजय चव्हाण व उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांच्यामार्फत करण्यात येतील यावेळी पंचायत समितीचे सदस्य देविदास राठोड बाबू काका समाधान पाटील उपासनी, कुंजीलाल चव्हाण, सुधीर सोनवणे, महेश मावळतकर असे विविध कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन भगवान ठाकरे सर यांनी केले नामदेव गोठवाल, राजधर आहेर, बबलू पाटील, मनोज राठौड, रविन्द्र पवार , दिनेश राठौड आदींसह पंचकुशीतील सर्व कार्यकर्त पदाधिकारी उपस्थित होते.

# नादरपूर येथे मराठवाडा मुक्ति संग्राम दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त कन्नड तालुक्यातील नादरपुर ग्रामपंचायत कार्यलया मध्ये ध्वजारोहणाचा कार्यक्रम उपसरपंच सागर रामदास निकम यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर पिशोर येथील शहीद जवान कै. सुनील दादाराव जाधव यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानिमित्ताने ग्रामपंचायत नादरपुर तर्फे शहीद जवान यांच्या स्मृती-प्रित्यार्थ चार आंब्याची झाडे व एक नारळाचे झाड पिशोर ग्रामस्थांच्या ताब्यात देण्यात आले.

तसेच मा. भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नादरपूर गावठाण हद्दीत भाजप शाखेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत मागासवर्गीय वस्तीत भूमिगत गटाराचे उद्घाटन करण्यात ही आले. जिल्हा परिषद शाळेतील ध्वजारोहणाचा कार्यक्रम गणेश प्रभाकर निकम (शालेय समिती सदस्य) यांच्या हस्ते करण्यात आला औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेचा ध्वजारोहण बँकेचे व्यवस्थापक श्री. सुरे यांच्या हस्ते करण्यात आला. गावातील आकस्मिक घटनेत मयत झालेले कै. नरेंद्र विटोरे व कै. नामदेव निकम यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते रामदास निकम यांच्या सोबत ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# आरोग्य केंद्राला संदीप जगताप यांच्या वतीने औषधांची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**लासुर स्टेशन :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला तीन चार दिवसा पासुन गोळ्या औषधांचा तुटवडा भासत होता.. सद्या पावसाचे वातावरण असल्यामुळे संसर्गजन्य आजार झपाट्याने पसरतात या स्थितीत नागरीकांना वेळेवर औषध गोळ्या उपलब्ध झाल्या पाहीजे त्यांचे आरोग्य सुरक्षित राहिले पाहीजे हा हेतू समोर ठेऊन लासुर स्टेशन येथील संदीप जगताप यांनी स्वखर्चाने प्राथमिक आरोग्य केंद्राला गोळ्या औषधांची मोफत मदत केली या प्रसंगी सोपानराव कळमकर,सुरेश जाधव,संजय पांडव, कल्याण पवार, प्रशांत जैन, टायगर ग्रुपचे सुरेश साळुंके,कल्पेश गायकवाड, योगेश घेलू त्याच बरोबर आरोग्य केंद्राचे डॉ.बापूसाहेब चाटे, डॉ. सुर्यवंशी, डॉ. शेख, प्रयोगशाळा तंज्ञ भिंगारे, औषध गोळ्या वितरक म्हस्के, प्रयोगशाळा तंज्ञ शरद पवार व सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान लासूर स्टेशन येथील आधुनिक केसरीचे नियमित वाचक समाजसेवक गौतम नाहाटा यांनीही बातमीची दखल घेऊन थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री तानाजी सावंत, राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, आ. प्रशांत बंब यांना बातमीचे कात्रण व निवेदन मेले केले आहे.

दैनिक आधुनिक केसरीने लासूर स्टेशन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधंचा ठणठणाट या मथळ्याखाली बातमी प्रकाशित केली होती त्यामुळे सामान्य गरीब रुग्णांना उपचारापासून दूर राहावे लागत होते कारण खासगी दवाखान्यात उपचार घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैसे लागतात डॉक्टरांची तपासणी फी सध्या शंभर रुपये असून गोळ्या औषधंचा खर्च वेगळा आहे त्यातच लहान मुलांना पावसाळ्याचे दिवस असल्याने व्हायरल इन्सफकशनचा फटका बसत असून खासगी दवाखाने रुग्णांनी खचाखच भरले असून सरकारी दवाखान्यात औषधंचा तुटवडा असल्याने हमाली व मजुरी तसेच हातावर पोट असणाऱ्या पालकांना त्यांच्या लहान मुलांना उपचार करण्यास पदरी पैसे नसल्याने हातउसने पैसे घेऊन उपचार करावे लागत असल्याने दैनिक आधुनिक केसरीच्या बातमीची दखल घेऊन आज प्राथमिक आरोग्य केंद्रात विविध आजारावरील गोळ्या औषधे भेट देण्यात आले आहे.
**–संदीप जगताप (सामान्य नागरिक)**






# शिक्षक भूमिपुत्राचा लाडझरीत गावकऱ्यांकडून सपत्निक सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** जि.प.बीड यांनी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केलेले कर्तव्यदक्ष शिक्षक सौदागर आबाजीराव कांदे यांचा सपत्निक भव्य नागरी सत्कार व गौरव लाडझरीच्या ग्रामस्थांनी केला. यावेळी ग्रामस्थ्यांची मोठी गर्दी जमली होती. गावंच लेकरू पुरस्कार मिळवून आलं याचा सगळ्यांना अभिमान वाटला. गावाच्या ग्रामपंचायत कार्यालया समोर मारुती मंदिरात मोठा कार्यक्रम झाला. कार्यक्रम स्थळी सत्कारमूर्तीचे आगमन होताच जोरदार फटाक्यांची आतिषबाजी आयोजकांकडून करण्यात आली. तसेच गावातील माता-भगिनी व नातेवाईकांकडून कांदे दाम्पत्याचे औक्षण करण्यात आले.

यावेळी सरपंच शिरीष नाकाडे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, यांच्यासह ईतरही प्रतिष्ठीत मंडळींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष गावचे उपसरपंच व्यंकटराव मुंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ साहित्यिक नागनाथ बडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गावचे सरपंच युवानेते शिरीष नाकाडे यांनी केले. साहित्यिक रमेश मोटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांभाळले. ग्रामीण कथाकार दत्ता वालेकर यांची विशेष उपस्थिती होती. अंकुश फड, पद्माकर आंधळे, महादेव फड, भास्कर आंधळे, तुकाराम हाडबे, विष्णु ढाकणे आदी शिक्षक मंडळींनी आपले मनोगत व्यक्त केले. तर बाळासाहेब शेप यांनी सौदागर कांदे यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. जन्मभूमीत झालेल्या गौरवाने भारावून गेलेल्या सौदागर कांदे यांनी मातृभूमीच्या कुशीत क्षणभर आत्मचिंतन करून गावकरी आणि गावातील तरुण मंडळी यांना गहिवरून जाण्यात संवाद साधला. सहकारी-गावकऱ्यांना संवाद साधताना कांदे गुरुजीही चांगलेच गहीवरले होते. बोलत असताना त्यांनी सर्वांना हात जोडून विनंती करत आवाहन केले की, आपल्या गावातील गरीब, होतकरू लेकरांना शिक्षणासाठी सर्वोतपरी सहकार्य करा. नवीन पिढी घडवा. गावातील जि.प. शाळेला सहकार्य करा. यावरच सर्वांचे उज्वल भविष्य अवलंबून आहे.....! तब्बल तीन तास सर्व गावकरी आपल्या भुमीपुत्राच्या या गौरव कार्यक्रमात अगदी उत्साहाने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ह.भ.प. रामराव चाटे महाराज यांनी केले....!

# श्रीमती अंजनाताई राजपूत यांना स्वामी रामानंद तीर्थ राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापुरकर बाबा यांच्या उपस्थितीत व प्रदेशाध्यक्ष राणीताई स्वामी यांच्या हस्ते देण्यात आला तसेच पदाधिकाऱ्यांच्या निवडी व स्वातंत्र्य सैनिकाचा सत्कार संपन्न मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ठेवण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय श्री आमदार संजय जी बनसोडे साहेब माजी राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष अरुण चव्हाण देशमुख इत्यादी उपस्थित होते.

मराठवाड्याच्या लातूर येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवम ब्रीक्स मानव अधिकार मिशन च्या वतीने १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी औरंगाबाद जिल्हयातील विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी औरंगाबाद जिल्ह्यातील इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते संमेलन सोहळ्याच्या व मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्तानेमराठवाडा मुक्ती संग्रामात सहभागी महान स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करून त्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तर हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्यातील लातूर नांदेड कोल्हापूर सोलापूर अमरावती अकोला बुलढाणा जालना रायगड हिंगोली पुणे अहमदनगर नाशिक जळगाव सातारा सांगली मुंबई ठाणे धुळे नंदुरबार सोयगाव,सिल्लोड व औरंगाबाद भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

दिनांक १८ सप्टेंबर रोजी आभ्यास शिबीर संपन्न झाले आसुन गेल्या वर्षभरात ज्यांनी संघटनेच्या बॅनर खाली कार्यक्रम घेतले आहेत आश्यांचा सन्मान करण्यात आला आसुन,महाराष्ट्र राज्याचे प्रदेशअध्यक्ष अरुणभाऊ चव्हाण देशमुख अजिंठा, श्री गोकुळसिंग राजपूत तालुकाध्यक्ष सोयगाव, जिल्हा उपाध्यक्ष औरंगाबाद शेख फेरोज भाई माहिला आघाडी औरंगाबाद जिल्हाध्यक्ष श्रीमती अंजनाताई राजपुत यांना विशेष स्वामी रामानंद तीर्थ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यांनी वर्षभर जे समाज कार्य केले त्याबद्दल त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले. तसेच राज्यातील अनेक पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली यावेळी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अरुणभाऊ चव्हाण,जिल्हा उपध्याक्ष शेख फिरोज, अंजनाताई राजपूत महिला आघाडीचे औरंगाबाद अध्यक्ष, सिल्लोड ता उपाध्यक्ष राधाताई झेलवार या मान्यवरांचा सत्कार राष्ट्रीय अध्यक्ष खंडापूरकर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली ॲड.राणीताई स्वामी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा यांच्या हस्ते सर्व छत्तीश जिल्ह्यातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच अंजना ताई राजपूत राज्यभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षावही करण्यात आला आणि त्यांनी यापुढेही जिल्ह्यातील भ्रष्टाचार बाहेर काढून जिल्हा भ्रष्टाचार मुक्त करणार असे सांगितले.




# शंभुनगर येथे भारतीय महिला फेडरेशनच्या शाखेची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शंभुनगर येथील महीला मोठ्या संख्येने भारतीय महिला फेडरेशनच्या सदस्य झाल्याने उपस्थित सभासद महीलांनी रुकसाना खान यांची अध्यक्षपदी तर सफीया शेख यांची सचिवपदी निवड केली. 21 सप्टेंबर रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व भारतीय महिला फेडरेशन तर्फे मनपा झोन फ समोर ड्रेनेज, पाणी, रस्ता , घंडागाडी, स्ट्रीट लाईट, स्वच्छता आदी मागण्यांसाठी निदर्शने करुन प्रभाग अधिकार्यांना निलेदन देण्यात येईल .

याबाबत असे की, शंभुनगर येथील नागरीची मत मागायला अनेक राजकीय पक्षाचे लोक येतात परंतु ड्रेनेज, पाणी, रस्ता, स्वच्छता , स्ट्रीट लाईट ई ची मागणी करायला नागरीक नगरसेवकाकडे जाताच बेकायदेशीर वस्ती असे कारण सांगतात, आमची मत चालतात आणि आमच्या समस्या दुर करायला नगरसेवकाला कंटाळा येतो, अशा भावना व्यक्त करीत मोठ्या संख्येने उपस्थित महीला भारतीय महिला फेडरेशनच्या सभासद झाल्या. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सफीया शेख उर्फ लाडो भाभी या होत्या. बैठकीचे प्रास्ताविक भाकपच्या शहर सहसचिव कॉ. अनिता हिवराळे यांनी केले तर भामफेच्या कॉ. माधुरी जमधडे यांनी संघटनेचा इतिहास सांगीतला. शंभुनगर मध्ये पावसाळ्यापूर्वी गल्ली नंबर 4 व 5 च्या ड्रेनेज लाईनचे काम पुर्ण करुन घेतल्याबद्दल भाकपचे शहर सचिव ॲड. अभय टाकसाळ यांचे आभार मानले व गल्ली नंबर 3 मध्ये अजुनही ड्रेनेजचे काम झाले नसल्याची तक्रारही केली. पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन शंभुनगरात न टाकल्याने महिला पुरुष लहान मुलांना, डोक्यावर, सायकलवर, हातगाडीवर भांडे ठेऊन लांबुन पाणी भरुन आणावे लागते. पाणी आणायला गेल्याने कामावर सुट्टी पडुन कमाई बुडते, पाणी तुंबल्याने अस्वच्छता होऊन परिसरात डेंगु व इतर रोग पसरण्याची शक्यता आहे. स्ट्रीट लाईट बंद असतात त्यामळे महिलांना असुरक्षित वाटते, भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. त्यामळे भीतीने माझी मुलगी शाळेत जात नाही अशीही समस्या महीलांनी व्यक्त केली, महागाई मोठ्या प्रमाणात वाढत आहे ईत्यादी असंख्य समस्यांचा पाढाच उपस्थित महीलांनी वाचला. दोन महिन्यापूर्वी शंभुनगर ते रेल्वे स्टेशन मनपा कार्यालया पर्यंत पदयात्रा काढण्यात आली होती. उर्वरीत नागरी समस्या दुर न झाल्यास पुन्हा पदयात्रा सुरु करण्याचा निर्णय देखील या बैठकीत घेण्यात आला. यावेळी अध्यक्ष : रुकसाना खान उर्फ रुक्को भाभी, सेक्रेटरी : सफीया शेख उर्फ लाडो भाभी, उपाध्यक्ष : शितल नवतुरे , फीरदोस इब्राहीम खान, सहसचिव : मंगल कुमावत, रुबीना जफर खान, कोषाध्यक्ष : शमीम बाजी , सदस्य : पुष्पा गवळी, राजश्री पाडवे, खुदुसीया खमर अशी 11 महीलांची कार्यकारी समिती निवडण्यात आली. दि. 21 सप्टेंबर 022 बुधवार रोजी दुपारी 3 वाजता मनपा झोन फ, जवाहरनगर पोलीस स्टेशनजवळ निदर्शने करण्यात येतील असाही निर्णय करण्यात आला. या निदर्शनास मोठ्या संख्येने नागरीकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळेस आपल्या सुरक्षेसाठी व हक्कासाठी लोकशाही मार्गाने होणाऱ्या संघर्षास नवनिर्वाचित कार्यकारी समितीने तयार रहावे, असे आवाहनही ॲड. अभय टाकसाळ यांनी केले.

# तोंडापूर येथे आदिवासी विवाहित गरोदर महिलेवर अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील तोंडापूर येथ तेरा दिवसानंतर आरोपीला पहूर पोलिसांनी बेड्या ठोकुन केला जेरबंद तोंडापुर येथील आदिवासी महिला सार्वजनिकशौचालयामधे शौचालय साठी गेली असताना तेथे एक नराधम लपुन बसलेला होता. त्याने या गरोदर महिलेवरती जोर जबरदस्तीने अत्याचार केला. कुनाला हे कृत्य कळुनये म्हनुण त्या महीलेला जबर मारहाण करुन जिवंत मारण्याचा प्रयत्न करुन मेलेल्या अवस्थेमधे गावाच्या बाजुला झाडा झुडपांमधे फेकुन दिले होते त्या महीलेच्या कुटुंबाने त्या महीलेचा शोध घेऊन जळगाव हास्पीलला घेऊन गेले असता तेथील डॉंक्टरांनी खोटा रिपोर्ट दिला आणी सांगीतले. या महीलेवरती जंगली रान डुकराने हल्ला केलेला आहे तुम्ही या महिलेला औरंगाबाद येथे घेऊन जा येथे या महिलेवर उपचार होनार नाही या डाक्टर च्या सांगण्यावरुन जळगाव पोलीस अधीक्षक डाक्टर प्रविण मुंडे यांनी सुध्दा हेच खळबळ जनक वक्तव्य केलं यामुळे आदिवासी संघटनांनी संताप व्यक्त केला या महीलेवरती जंगली रान डुकराने हल्ला केलेला आहे ...ही महिला तेरा ते चौदा दिवस औरंगाबाद घाटी रुग्नालयमधे आय .सी. यु. रुम मधे बेशुद्ध अवस्थेमधे उपचार घेत होती. तो पर्यंत पोलीसांनी या प्रकरनामधे कोनतीही चौकशी केलेली नाही चक्क तेरा दिवसांनी ही महिला शुध्दीमधे आल्यानंतर वकील आस्मा शेख आणि आदिवासी संघटनाचे प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी आणी संघटनेचे पदाधीकारी यांनी घडलेला पुर्ण प्रकाराला वाच्या फोडली. हा संपुर्ण प्रकार पहुर पोलीसांना सांगीतला तो पर्यंत हा आरोपी नराधम तेरा दिवस खुलेआम बाहेर मोकळा हींडत होता हा प्रकार पोलीसांच्या लक्षात येताच पहुर पोलीसांनी औरंगाबाद घाटी रुग्नालय गाठले आणि त्या पिडीत महीलेचा जवाब नोंदवुन त्या महिलेच्या सांगन्यावरुन त्या नराधमाला पहुर पोलीसांनी अटक केली या प्रकरनामधे या अत्याचार करुन जीवे मारण्याचा प्रयत्न करना-या नराधमावरती गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल केलेले आहे. या प्रकरनामधे राजकीय दबाव असल्यामुळे हे प्रकरण दाबन्याचा प्रयत्न झालेला आहे असे अडव्होकेट आस्मा शेख आणि आपसर तडवी यांनी सांगीतले.





# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी कृषी विमा कंपनीस संपर्क साधावा : कृषी अधिकारी एस.जी. वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सर्व फर्दापूर, बनोटी, जरंडी, जामठी, व सावळदबारा परिसरातील शेतकरी बांधवांना सोयगाव कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ यांच्याकडून जाहीर आवाहन करण्यात येत आहे. सोयगाव तालुक्यात मागील आठवडयापासून सतत संततधार पाऊस तसेच काही महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झालेली आहे. सोयगाव तालुक्यात खरीप हंगाम सन २०२२-२३ मध्ये शेतकऱ्यांनी पिक विमा काढलेला आहे. अशा ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा भरलेला आहे अशा शेतकऱ्यांचे शेतपिकाचे नुकसान झाले असल्यास संबंधित शेतकऱ्यांनी स्वतः पिकः नुकसानीची घटना घडल्यापासुन ७२ तासांच्या आत भारतीय कृषि विमा कंपनीस पिक नुकसानीबाबत अवगत करणे आवश्यक आहे. तरी पिक नुकसानीबाबत भारतीय कृषि विमा कंपनीस अवगत करण्यासाठी शेतकऱ्यांनी खालील पर्यायाच्या अवलंब करावा. १.भारतीय कृषि विमा कंपनीस त्यांच्या 18004195004 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा.
कंपनीच्या मोबाईल ॲप द्वारे नुकसानी पुर्वसुचना द्यावी. किंवा ३. विमा कंपनीचे कार्यालय (पत्ता मेन रोड सोयगाव बालाजी बजाज शोरूम व खरेदी विक्री संघ कार्यालय समोर) येथे लेखी पत्राद्वारे पिक नुकसानीची तक्रार सर्व परिसरातील शेतकऱ्यांनी दाखल करावी, सोयगाव तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सोयगाय यांचे कार्यालयास लेखी पत्राद्वारे पिक नुकसानीची ४. तक्रार दाखल करावी. तसेच पिक नुकसानीबाबत काही प्रश्न उदभवल्यास भारतीय कृषि विमा कंपनीचे सोयगाव तालुका प्रतिनिधी श्री गजानन जाधव यांच्याशी संपर्क साधावा (मोबाईल नं. 9766092543) अशे आवाहन तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ यांनी केले आहे.

# आजच्या शिक्षणासोबत हरिपाठाची गरज : ह.भ .प निवृती महाराज

## उदयोजक मनोज पवार यांचे किर्तनात केले महाराजांनी गोड कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील गिरणी मैदान येथे उद्योजक मनोज पवार यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यात शनिवारी आयोजित कीर्तनात ते बोलत होते.निवृत्ती महाराज इंदोरीकर म्हणाले,जी माणसं निःस्वार्थपणे समाजाची सेवा करतात ती आयुष्यात मोठी होतात. वाढदिवसानिमित्त किर्तन रूपी सेवा घेणे व समाजातील गोरगरीब जनतेची सेवा करतात यालाच संस्कार म्हणतात मनोज पवार यांचे केले गोड कौतुक या वेळी बोलतांनी म्हणाले की ज्ञाना सोबत आध्यात्मिकाची गरज आहे, विदयार्थीने मोबाईल बाळगणे टाळावे, शरीर उत्तम ठेवण्यासाठी घरचच जेवण घ्याव, युवांनी वेसन टाळावे व प्रत्येकांनी आपल्या आंगनात व कुंड्यात तुळशीचे रोपे लावावीत जेणे करून आपल्याला ऑक्सीजन मिळेल.
यावेळी रामेश्वर महाराज मगर नावडीकर, गंगाधर कवडे महाराज, रावसाहेब महाराज शिंदे, पुष्पाताई पवार, माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव, युवा उद्योजक मनोज पवार, ऊर्मिला पवार, शहर प्रमुख सुनिल पवार, सुनील निकम, पवन सोनवणे, संदेश पवार, याकूब भाई, मनोज देशमुख, सुरेश डोळस, पांडुरंग घुगे,संदिप नरवडे, सिद्धार्थ निकाळजे, सोपान शिरसाठ, प्रवीण घाटगे, महेश सोनवणे, शुभम नागरे, जयेश बोरसे, बंटी जाधव, योगेश त्रिभवण, सोमनाथ दाभाडे, पवन ठाकूर आदींसह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# लासूर स्टेशनचा सर्फराज शहा एक वर्षाकरिता हर्सूलमध्ये स्थानबद्ध

## कायद्याचा धाक : शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावगुंडात उडाली खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील लासूर स्टेशन सावंगी येथील राहणारा सर्फराज सलीम शहा (वय २५ वर्ष )याने लासूर स्टेशन व परिसरात वारंवार चोरी करणे, घरफोडी करणे, जबरी चोरी करणे, विनयभंग करणे, लोकांना मारहाण करणे, लोकांमध्ये दहशत निर्माण करणे, पोलिसांनी वारंवार अटक करून सुद्धा कोणताही कायद्याचा धाक न बाळगता गुन्हे करून लोकांचे जीवितास धोका निर्माण करणे असे वर्तन वारंवार करीत असल्याची जाणीव झाल्याने त्यांचे विरुध्द शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांनी MPDA अन्वये विशेष प्रस्ताव तयार करून तातडीने औरंगाबादचे ग्रामीण पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांच्यामार्फत जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्याकडे पाठवला होता जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यानी सदरचा प्रस्ताव 18 सप्टेंबरला मंजूर केला त्यावरून सर्फराज सलीम सहा यास शिल्लेगाव पोलिसांनी दिनांक १८ सप्टेंबर रोजी MPDA कायद्या अंतर्गत एक वर्षा करिता हर्सूल जेल मध्ये स्थानबद्घ केले आहे दोन महिण्या पूर्वी सिल्लेगाव पोलिस स्टेशन अंतर्गत सनव येथील शेख मुजीब यास एक वर्षासाठी स्थानबद्ध केलेले आहे परिणामी लोकांना गावगुंडांनी त्रास दिला तर कायदा आपले काम करील हा संदेश जनसामान्य आणि लासूर स्टेशन परिसरात पसरला आहे तसेच गाव गुंडामध्ये खळबळ उडाली आहे सदरची कारवाई मा. श्री. मनिष कलवानिया पोलिस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण), मा. डॉ. श्री. पवन बनसोडे अप्पर पोलिस अधीक्षक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर रेंगे,शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मछिंद्र सूरवसे, लासूर स्टेशनचे बिट अंमलदार पोलीस हेड कॉनस्टेबल तात्यासाहेब बेदरे, पोलीस नाईक उमेश गडे, पो.कॉ.हनुमंत सातपुते, पोकॉ.शगुण थोरे, पो. कॉ.सुरेश भिसे, पो. कॉ.राजू निसर्ग , पो.कॉ.अक्षय साळुंके, पो.हे.कॉ.विठ्ठल राख एलसीबी यांनी केली आहे.



सर्वसामान्य जनतेला गावगुंडांनी त्रास दिला तर कायदा आपले काम करीतं राहील मात्र विशेषकरून महिला व मुलींना जर कोणी त्रास देत असेल तर वारंवार कारवाई करूनही अश्या घटना घडतं असतील तर अश्या गावगुंडावार अश्या प्रकारची कडक कारवाई केली असून दोन महिन्यापूर्वी सनव येथील मुजीब शेख याच्यावरही स्थानबद्धतेची कारवाई शिल्लेगाव पोलिसांनी केली आहे यापुढेही पोलिसांचा व कायद्याचा धाक राहावा म्हणुन गावागुंडावर स्थानबद्धतेची कारवाई शिल्लेगाव पोलिसांतर्फे केली जाईल दरम्यान शिल्लेगाव पोलिसांनी स्थानबाद्धतेच्या कारवाईचा संदेश जनसामान्य आणि लासूर स्टेशन परिसरात पसरला असून गाव गुंडामध्ये खळबळ उडाली आहे .

**–मछिंद्र सुरवसे (पोलीस निरीक्षक, शिल्लेगाव )**

# चित्ते आल्याने रोजीरोटीचा प्रश्न सुटणार का : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** तुमच्या - माझ्या देशात व महाराष्ट्रात जे महागाईचे, बेरोजगारीचे व कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न आहेत त्यांना व्यवस्थितपणे बाजूला ठेवून तिसरेच प्रश्न पुढे आणले जातात. आता देशात चित्ते आले ठिक आहे... ते वाढावेत,पशूधन वाढावे हेही ठीक आहे परंतु यातून लोकांच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटणार आहे का? वेदांताचे काय होणार आहे ते सांगा... तरुणांच्या हाताला नोकरी मिळण्यासाठी अजून किती लाख कोटीची गुंतवणूक येणार हे सांगा असा रोखठोक सवाल राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केंद्रसरकारला केला. जनता दरबार उपक्रमास उपस्थित राहिल्यानंतर अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी केंद्रसरकार, राज्यसरकारवर हल्लाबोल केलाच शिवाय राजकारणात होणाऱ्या वैयक्तिक टिकेवर नाराजी अजित पवार यांनी व्यक्त केली. वेदांतासारख्या प्रकल्पातून राज्यात गुंतवणूक येत असताना राष्ट्रवादी या चांगल्या कामाला नक्कीच पाठिंबा देईल. मात्र त्यातून पर्यावरणाचा ऱ्हास होता कामा नये असेही अजित पवार यांनी सरकारला ठणकावून सांगितले.

वेदांताचा जो फॉक्सकॉन प्रकल्प होता त्याबद्दल चर्चा बरीच झाली. आता मुख्यमंत्री दिल्लीत जाणार आहेत. त्यांनी याचा पाठपुरावा करावा तो त्यांचा अधिकार आहे. बेरोजगारांमध्ये असलेली नाराजी दूर करण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी सर्वस्व पणाला लावावे असे सांगतानाच उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारचे राज्यात मोठमोठे प्रकल्प यावेत असा प्रयत्न सुरू होता. मात्र काही पक्षातील लोक वेगळया मागण्या किंवा डिमांड केली होती म्हणून प्रकल्प गेला असे स्टेटमेंट करत आहेत. मी उपमुख्यमंत्री असताना असं अजिबात झालेले नाही कारण नसताना संभ्रमावस्था निर्माण करण्याचा प्रयत्न हा केला जातो आहे. जर कुणाला वाटत असेल तर केंद्रसरकार, राज्यसरकार, एजन्सी तुमच्या हातात आहेत. तर चौकशी करावी पण स्टेटमेंट करुन बेरोजगारांमध्ये गैरसमज निर्माण करु नये.



वास्तविक असं काही घडलेले नाही तरीपण चौकशी करायची असेल तर जरुर करा 'दूध का दूध, पानी का पानी' होऊन जाऊद्या असे थेट आव्हानच अजित पवार यांनी शिंदे सरकारला दिले. काही जण अफवा पसरवत आहेत. चुकीच्या बातम्या देण्याचा प्रयत्न करत आहेत की, वेदांताला नाकारलं हे साफ खोटं आहे, चुकीचं आहे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

काहीजण बोलत आहेत की, अजून प्रकल्प आणणार आहे तर पुन्हा महाराष्ट्राला सांगतो महाराष्ट्राच्या हिताचे जे - जे प्रकल्प असतील ते - ते प्रकल्प महाराष्ट्रामध्ये यावेत फक्त त्यातून पर्यावरणाचा ऱ्हास होता कामा नये ही बाब सरकारने लक्षात ठेवावी आणि त्याची नोंद घेतली पाहिजे असेही अजित पवार म्हणाले.

नैसर्गिक आपत्तीचे पैसे नुकसानग्रस्तांना मिळालेले नाही. अजून काही भागात मुसळधार पाऊस पडतोय. याबाबत सरकारने नवीन सूचना दिल्या पाहिजेत. एनडीआरएफचे निकषाप्रमाणे जास्तीचा पाऊस पडल्यानंतर जी काही मदत करायला हवी किंवा अधिवेशनामध्ये सरकारने जी काही मदत जाहीर केली होती. त्याअनुषंगाने पुढच्या मदती जाहीर केल्या पाहिजेत. परंतु त्या होत नाही ही शेतकऱ्यांची खंत आहे. यामध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मदत व पुनर्वसन मंत्री यांनी तातडीने लक्ष घालावे अशी मागणीही अजित पवार यांनी केली.

काल ग्रामपंचायतीच्या निवडणूका झाल्या. टिव्ही चॅनेलवर वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या दाखवल्या जात आहेत. की अमुक पक्षाला सर्वाधिक जागा वगैरे परंतु या ग्रामपंचायत निवडणुका पक्षीय चिन्हावर होत नाहीत हे त्रिवार सत्य आहे. एकंदरीतच जे आकडे दाखवले जात आहेत त्यामध्ये महाविकास आघाडीला जास्त जागा मिळाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे यातून सर्वांनीच बोध घ्यायला हवा. ही निवडणूकीची रंगीत तालीम आहे असे स्पष्ट करतानाच या निवडणुकीत राष्ट्रवादी विचाराचे जे लोक निवडून आले आहेत त्यांचे अजित पवार यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

एसटीला १४०० कोटींची तरतूद आम्ही अर्थसंकल्पात केली होती असे सांगताना अजित पवार यांनी एसटीचे पगार साडेतीनशे कोटीवर जातात. मधल्या काळात जो काही संप झाला होता त्यानंतर एसटी सुरू झाल्या आहेत. एसटीची त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून पगार होतील अशी परिस्थिती राहिलेली नाही. अर्थसंकल्पात पैसे कमी पडतील ते राज्यसरकार तिजोरीतून देईल असे जाहीर करण्यात आले होते. आताच्या पुरवण्या मागण्यातदेखील हजार कोटीची अधिकची तरतूद शिंदेसरकारने दाखवली होती. म्हणजे २४०० कोटीचा निधी आणि कमी पडले तर नागपूरच्या अधिवेशनाला ते दाखवू शकतात त्यामुळे पैसे जास्त झाले की कमी झाले याला महत्व देऊ नका एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर व्हावेत याबद्दल सरकारने बारकाईने लक्ष द्यावे अशी सूचनाही अजित पवार यांनी सरकारला केली.

दसरा मेळाव्यासाठी अजूनही उध्दव ठाकरेंच्या शिवसेनेने प्रयत्न करावा. वास्तविक शिवसेनेचा दसरा मेळावा हा शिवसेनेची स्थापना झाल्यापासून शिवाजी पार्कमध्ये दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्यापासून सुरू झाला आणि त्यानंतर बाळासाहेबांनी ती जबाबदारी दसरा मेळाव्यातच उध्दव ठाकरे यांच्यावर पक्षप्रमुख म्हणून सोपवली होती. शिवसेनेचं नेतृत्व उध्दव ठाकरे हे करतील असे बाळासाहेबांनी जाहीर केले होते. आता बीकेसीच्या मैदानावर शिंदे गटाला मेळावा घ्यायला परवानगी मिळाली आहे तर शिवाजी पार्कवर उध्दव ठाकरे यांना परवानगी द्यायला हवी. दोन्ही मेळावे व्हावेत आणि दोघांचे विचार राज्याने ऐकावे... उध्दव ठाकरे हे बाळासाहेबांचे पुत्र आहेतच असे पत्रकारांच्या प्रश्नावर बोलताना अजित पवार यांनी स्पष्ट केलेच शिवाय जसं आम्ही स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचं नाव घेतो... गांधी नेहरुंचे नाव कॉंग्रेस घेते... जे आहे ते आहे... जी पुण्याई आहे ती घेतली... आपल्या वडिलांचे, आपल्या पूर्वजांचे नाव घेतो ना... ही परंपरा आज नाही... देशात ही पहिल्यापासून आहे आणि ती पुढे चालतच राहणार आहे असेही अजित पवार यांनी सांगितले.

'निंदकाचं घर असावं शेजारी' ते निंदकाचं घर आहे... जी काही निंदा करायची असेल ती करु द्या... आम्हाला काही फरक पडत नाही... आम्ही लोकांच्यामध्ये काम करणारे कार्यकर्ते आहोत... आमच्या राष्ट्रीय नेत्यांची शिकवण आहे... आमच्यापरीने आम्ही काम करत राहणार ... जनतेला जे योग्य वाटेल तर ती त्यांच्या पाठीशी उभी राहणार आहे... उदाहरणार्थ एकेकाळी दोन खासदार निवडून आलेला पक्षदेखील वर जाऊ शकतो हे निंदकांनी लक्षात ठेवावे असा टोलाही अजित पवार यांनी यावेळी लगावला.

जिथे प्रकल्प उभा राहणार आहे तेथील लोकांचा पाठिंबा असणे महत्वाचे आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होणार नसेल तर बहुमताचा आदर केला पाहिजे असेही अजित पवार म्हणाले.

वेगळया विदर्भाबाबत जी चर्चा सुरू आहे त्याला तुम्ही महत्त्व देऊ नका. जोपर्यंत स्थानिक जनता वेगळ्या विदर्भासाठी पाठिशी उभी राहत नाही तोपर्यंत महाराष्ट्रात वेगळा विदर्भ होऊ शकत नाही... कितीही आले आणि कितीही गेले तरी त्याचा काहीही परिणाम होणार नाही असेही अजित पवार यांनी वेगळया विदर्भातील प्रश्नावर बोलताना सांगितले. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामण बारामतीत येणार असल्याचा प्रश्न विचारताच अजित पवार यांनी बारामतीत त्यांचे स्वागत आहे. कुणालाही कुठेही जायचा अधिकार आहे. अजून कुणाला यायचं असेल त्यांनी यावं बारामतीकर त्यांचं मनापासून स्वागत करतील आणि वेगवेगळ्या निवडणूकीत कुणाची बटनं दाबायची ते दाखवतील असे स्पष्ट केले. तुम्ही राजकारणापुरतं राजकारण करा ना... आपल्या महाराष्ट्राची संस्कृती नाहीय... आपली महाराष्ट्राची परंपरा नाहीय...आपल्या महाराष्ट्राला तशाप्रकारची शिकवण नाहीय... राज्यातील लोकांचे नुकसान होतेय... बेरोजगारांच्या नोकऱ्या जात आहेत... शेतकरी अडचणीत सापडला आहे शेतमजुर, कामगार अडचणीत आहे... सर्व घटक अडचणीत येत आहेत. त्याबद्दल बोला ना... एखाद्याच्या वैयक्तिक गोष्टीवर का बोलता... रामदास कदम यांच्याशी आमचे चांगले संबंध आहेत... मात्र खालच्या पातळीवर जाऊन टिका केली जात आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या, शाहू - फुले - आंबेडकरांच्या महाराष्ट्रात आहोत. इथे ही परंपरा नाही. वैयक्तिक कुणालातरी डोळ्यासमोर ठेवून एखाद्याची निंदानालस्ती करणं बरोबर नाही हे लोकांना आवडत नाही.

## उंदीरवाडीच्या अंगद लोणे गुरुजींना दोन राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** रयतेचा कैवारी दैनिक वृत्तसेवा तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त पनवेल येथे डी. बी. विसपुते महाविद्यालयात दिनांक 18/09/2022 रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात वैजापूर तालुक्यातील उंदीरवाडी गावातील उपक्रमशील शिक्षक श्री अंगद गोविंदराव लोणे यांना रयतेचा कैवारी परिवारातर्फे राज्यस्तरीय" विशेष सेवा गौरव" पुरस्कार व नांदेड येथील अविष्कार फाउंडेशन तर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. श्रीमती मनीषा पवार उपसंचालक तथा मुंबई विभाग आर आर य प्रमुख, रयतेचे कैवारी दैनिक वृत्तसेवा चे संपादक श्री शाहू भारती सर, आदर्श शैक्षणिक समूह चे संस्थापक डी बी विसपुते, गोदावरी परळीकर महाविद्यालय ची प्राचार्य डॉक्टर भगवान सिंग, श्रीमती सुनिता चांदोरकर उपशिक्षणाधिकारी रायगड, शिक्षक सेनेचे पदाधिकारी ज्ञानेश्वर म्हात्रे, अनिल बोरणारे, ग्लोबल अविष्कार फाउंडेशन नांदेड चे सचिव श्री बालाजी तोरणे कर, श्री गणेश राऊत, श्री ज्ञानेश्वर सोरटे, किरण कदम, अक्षय न्यायाधीश, श्रीरंग औचरमल, भरत काळे सर, नितिन अंतरकर, गजेंद्र बोंबले सर यांची उपस्थिती होती.



## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### पन्नाशीनंतरचे कामजीवन...

आधुनिक केसरी

पन्नाशीनंतरच्या कामजीवनाबद्दल अनेकांना अतिशय कुतुहल आणि उत्कंठा देखील असते. अनेक जण असेही म्हणतात की एकदा का पन्नाशी उलटली की आपला कार्यभाग संपला. मुलेही मोठी झाली आता सेक्सची गरज नाही. अनेकांना असं वाटतं की मुलेबाळे झाली, त्यांची लग्न झाली की सामाजिकदृष्ट्याच हा भाग संपतो किंवा कमी होतो.

* खरं म्हणजे असे अजिबातच नाही. सेक्स हे एक प्रकारचे 'ब्रेन टॉनिक' आहे.
जे शरीर आणि आरोग्य निरोगी राखण्यासाठी भरपूर मदत करते.
* काही कारणांमुळे लैंगिक शिथिलता आली असेल तर तज्ज्ञांना दाखवून
त्यावर उपचार करून घेता येतात.
* वय वाढल्यानंतर लैंगिक क्रिया किंवा इच्छा कमी होते हे अत्यंत चूक आहे. बऱ्याचदा वय जास्त असलेल्या स्त्रीसोबत संबंध असणे किंवा तिच्यासोबत
लग्न करणे हा विषय आता पूर्वीसारखा अमान्य राहिलेला नाही.
* पन्नाशी उलटलेली व्यक्ती, कमी वय असलेल्या व्यक्तीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे सेक्स करू शकतात.
कारणे : त्यांना क्रिया करताना अजिबात घाई किंवा लवकर उरकण्याची गडबड
नसते. ते समोरच्या जोडीदाराला पूर्ण आनंद देण्यासाठी प्रयत्नशील असतात.
* समागम करणे एवढेच त्यांचे ध्येय नसते. त्यांना इतर गोष्टींमध्ये (फोर प्ले)
मध्ये जास्त रस असतो.
* अनुभवांमुळे त्यांच्यात एकप्रकारची परिपक्कला आलेली असते.

**पन्नाशीनंतरचे सेक्स लाईफ सुदृढ ठेवण्यासाठी काय कराल ?**

* मुलं मोठी झालेली असतात व लग्नानंतर वेगळी झालेली असल्यामुळे जोडप्याला एकांत मिळण्याचा वेळ वाढलेला असतो.

**(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

## २०० आमदार, ३५० खासदार असे सत्तापिपासू भाजपाचे उद्दिष्ट असते : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपा आणि राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवर टीका केली आहे. ग्रामपंचायत निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर बोलताना पटोलेंनी "२०० आमदार, ३५० खासदार असे सत्तापिपासू भाजपाचे उद्दिष्ट असते. आमचे उद्दिष्ट हे जनतेचे काम आहे." असं म्हटलं आहे. तर, विरोधात असताना भाजपावाले महागाई विरोधात बेंबीच्या देठापासून ओरडायचे. असं म्हणत त्यांनी महागाईवरून भाजपावर निशाणा साधला आहे.

ते म्हणाले की, उद्दिष्ट हे महाराष्ट्राच्या अडचणीत आलेल्या शेतकऱ्याला मदत दिली गेली पाहिजे. रस्त्यांवरील खड्डे तातडीने दुरूस्त केले गेले पाहिजेत. बेरोजगारांबद्दलची भूमिका स्पष्ट करून तातडीने नोकरभरती केली पाहिजे. याशिवाय ज्या पद्धतीने शेतकऱ्यांची दयनीय अवस्था करून पंतप्रधानांच्या जन्मदिनी एक तरूण शेतकऱ्याने जी आत्महत्या केलेली आहे, त्यातूनही बोध सरकारने घेतला पाहिजे हीच काँग्रेसची मागणी आहे. तर महागाईच्या मुद्द्यावरून टीका करताना पटोलेंनी सांगितले की "केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, राज्य सरकारनेच आता महागाई कमी करण्यासाठी पावलं उचलली पाहिजेत.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in